
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ८४
www.ramprahar.com
गुरुवार, १० ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## परतीच्या पावसाचा तडाखा आणखी चार दिवस



**मुंबई :** राज्यातील अनेक भागात परतीच्या पावसाने हजेरी लावली. राज्यात पुन्हा पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले असून पुढील चार दिवस तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. राज्यात बुधवारी ऑक्टोबर हिटने हैराण झालेल्या नागरिकांना परतीच्या पावसाने काही दिलासा दिला असला तरी वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. रायगड जिल्ह्यातही बुधवारी सकाळपासूनच ढगांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. मुंबईसह अनेक ठिकाणी पाणी साचल्याचे पहायला मिळाले. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मात्र नुकसान झाले आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास पुन्हा हिरावला जातोय की, काय अशी भीती शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

## अंतरंग

'अपारंपरिक ऊर्जा वापरामुळे विजेचे दर कमी होणार'/२
महात्मा फुले महाविद्यालयाला महिला कबड्डी स्पर्धेत 'सुवर्ण'/३
परतीच्या पावसामुळे बोटी पुन्हा किनाऱ्यावर/७

# युवक, शेतकरी, विद्यार्थ्यांनाही लाडक्या बहिणींसोबत बळ देणार

## मुख्यमंत्री शिंदे यांची माणगावातील वचनपूर्ती सोहळ्यात ग्वाही






**माणगाव : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी व क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरू राहणार आहे. या योजनेसाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, तसेच सद्यस्थितीत असणारी दरमहा एक हजार ५०० रुपयांची रक्कम वाढवत टप्प्याटप्प्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणींना राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमात दिली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमाचे बुधवारी (दि.९) माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्य मार्ग पहिवहन महामंडळ अध्यक्ष भरत गोगावले, पेट्रोलियम व नॅचरल गॅस मंत्रालय अध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, महिला व बालविकास विभाग सचिव डॉ. अनुपकुमार यादव, कोकण विभागीय आयुक्त डॉ.राजेश देशमुख, महिला व बालविकास विभाग आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे, एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त डॉ.कैलास पगारे, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, शिवसेनेचे राज्य प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्या ॲड. सायली दळवी, जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चाळके, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, युवा सेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, माणगाव नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यादव, मुख्यमंत्र्यांचे खासगी सचिव डॉ. अमोल शिंदे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कार्यक्रमाला व्हिडीओद्वारे शुभेच्छा दिल्या.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महिलांच्या जीवनात सुखाचे, आनंदाचे दिवस यावेत हिच भाऊ म्हणून प्रामाणिक इच्छा आहे आणि म्हणूनच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे बहिणींना दर महिन्याला दीड हजार रुपये माहेरचा आहेर मिळणार आहे. (पान २ वर..)

### समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी कटिबद्ध –उपमुख्यमंत्री अजित पवार

राज्य शासन समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सर्वात लोकप्रिय ठरली आहे, तसेच वर्षातून तीन मोफत गॅस सिलिंडर देण्याची योजनाही सुरू आहे. त्यामुळे महिला समाधानी असून लाडकी बहीण योजनेतून व्यवसाय सुरू करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत असल्याचे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले.

### विविध लाभांचे वाटप

लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व लाभार्थ्यांपैकी प्रातिनिधिक स्वरूपात १० महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते धनादेश प्रदान करण्यात आला, तसेच पिंक ई-रिक्षा, लेक लाडकी योजना, मोफत गॅस सिलिंडर यांसह अन्य योजनेच्या महिला लाभार्थ्यांनाही धनादेश व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.



## तरुणांच्या शिक्षणासाठी शासन प्रयत्नशील –आमदार प्रशांत ठाकूर

### कळंबोलीत आदिवासी वसतिगृहाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जो शिक्षण घेईल, तो कितीही श्रीमंत व्यक्तीला मागे टाकून पुढे जाऊ शकतो. ही ताकद शिक्षणामध्ये आहे. म्हणून शिक्षण घेण्यासाठी तरुणांना महायुतीचे सरकार पुढाकार घेऊन त्यांना प्रवृत्त करीत आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि.९) कळंबोलीमध्ये आदिवासी मुलांच्या वसतिगृहाच्या भूमिपूजनावेळी केले.

राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या वतीने रायगड जिल्ह्यात चार ठिकाणी आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहाच्या नूतन इमारतीच्या कामाचे भूमिपूजन बुधवारी करण्यात आले. त्यानुसार कळंबोलीमध्ये २५ कोटी ४७ लाख रुपयांच्या निधीमधून उभारण्यात येणाऱ्या या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, भाजपचे कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे, सुनील पाटील, चिटणीस रुपेश धुमाळ, कळंबोली सरचिटणीस दीलीप बिस्ट, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, मालडुंगेचे सरपंच सिताराम चौधरी, सहाय्यक अभियंता धनंजय धारणकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रवीण सोळसकर, तुषार गावीत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि अधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### देशातील गरिबांना २०२८पर्यंत मिळणार मोफत धान्य

**नवी दिल्ली :** देशातील गरीब जनतेला पुढील चार वर्षे मोफत धान्य मिळत राहिल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.९) पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोफत धान्य वितरणाची मुदत चार वर्षांसाठी वाढवण्यास मंजुरी देण्यात आली. या बैठकीत इतर अनेक योजनांना ग्रीन सिग्नल देण्यात आला आहे. पुरवठा साखळी विकसित करण्यासाठी ११,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. फोर्टिफाईड तांदळाची गुणवत्ता तपासण्यासाठी ५२ लॅब तयार करण्यात आल्या आहेत.

### भाविकांवर मोकाट जनावरांचा हल्ला; दोघे गंभीर जखमी

**मनमाड :** कोटमगाव देवीच्या यात्रेतून परतत असताना मोकाट जनावरांचा दोन भाविकांवर हल्ला केला. या हल्ल्यात भाविक गंभीर जखमी झाले आहेत. येवल्यातील कोटमगाव येथील नवरात्रोत्सवातून घरी परतत असताना सोनल विजय दाणेज व साई विजय दाणेज या दोघांवर मोकाट जनावरांनी हल्ला केला. या हल्ल्यात हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## आमदार प्रशांत ठाकूर खऱ्या अर्थाने 'लोकप्रतिनिधी' –खासदार बारणे

### पनवेल महानगरपालिकेच्या कोट्यवधींच्या विकासकामांचे भूमिपूजन, लोकार्पण



**पनवेल : प्रतिनिधी**

आपल्या कामाच्या माध्यमातून ठसा उमटवणाऱ्या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सत्कारासाठी मी याच व्यासपीठावर दोन महिन्यांनी पुन्हा येईन. ते खऱ्या अर्थाने 'लोकप्रतिनिधी' आहेत, असे गौरवोद्‌गार खासदार श्रीरंग बारणे यांनी काढले.

पनवेल महापालिकेच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण मंगळवारी (दि.८) दुपारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ऑनलाईन करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, माजी नगरसेवक अनिल भगत, जयंत पगडे, हरेश केणी, बबन मुकादम, अजय बहिरा, राजश्री वावेकर, दर्शना भोईर, रुचिता लोंढे, शिवसेना नेते रामदास शेवाळे, भारत जाधव उपस्थित होते.

या वेळी खासदार श्रीरंग बारणे यांनी, आठ वर्षांत पनवेल महापालिकेने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली केलेली प्रगती व विकासकामे यांचा आढावा घेताना पनवेलमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या कामाचा येथे ठसा उमटवला आहे. काम करणारा, लोकांच्यात मिसळून जाणारा आमदार, जनमानसांत मिसळून जाणारा लोकप्रतिनिधी असल्याचे सांगून येत्या निवडणुकीत ते पुन्हा निवडून येतील, असा विश्वास व्यक्त केला. त्यांचा सत्कार करण्यासाठी आपण या रंगमंचावर पुन्हा येऊ, असेही सांगितले.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी, या महापालिकेची स्थापना झाल्यापासून आठ वर्षांत पनवेलकरांना अभिमान वाटेल, अशी वाटचाल केली असल्याचे सांगितले. माजी आयुक्त गणेश देशमुख यांनी सूत्र हाती घेतल्यावर खऱ्या अर्थाने कामाला सुरुवात झाली. राज्य आणि देशपातळीवर महापालिकेला पारितोषिके मिळाली. त्यामध्ये मिळालेले सगळ्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. नवीन महानगरपालिकेची घडी बसवताना शिस्त गरजेची असते. ती शिस्त आयुक्तांनी बसवली. गणेश देशमुख यांनी आपल्या कर्तृत्वाने चांनागला आदर्श घालून दिला. त्याचा फायदा महापालिकेला निश्चितच होईल. महापालिका कर्मचाऱ्यांना यंदा ३० हजार रुपये बोनस मिळणार आहे. (पान २ वर..)

### या विकासकामांचे झाले लोकार्पण

- आसूडगांव व इतर ३ ठिकाणे नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र
- मोबाईल मेडिकल युनिट्स (फिरता दवाखाना) एकूण २ वाहने.
- वळवली येथील पनवेल महानगरपालिकेची प्राथमिक शाळा.
- अग्निशमन वाहन, ॲडव्हान्स्ड रेस्क्यू व्हेईकल, ॲडव्हान्स्ड फायर इंजिन.
- पर्यावरण जनजागृती निर्माण करण्यासाठी वाहन.
- रामकि ग्रुप यांचे सीएसआर निधीतून बहुउद्देशीय सभागृह
- लोकनेते स्व. दि.बा. पाटील इंग्लिश मिडियम स्कूल
- धुळीचे प्रदूषण नियंत्रण ठेवण्याकरिता एकूण ४ वाहने
- फिरते वातावरणीय हवा गुणवत्तामापक केंद्र वाहन

(छाया : सुधीर नाझरे)




**सातारा : छत्रपती शिवाजी महाराजांच्या देदीप्यमान पराक्रमाची साक्ष देणारा किल्ले प्रतापगड मंगळवारी रात्री ३६५ मशालींच्या प्रकाशात उजळून निघाला. भवानी मातेच्या प्रतिष्ठापनेच्या ३६५व्या वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मशाल महोत्सवात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिलेल्या शिवभक्त आणि देवीभक्तांचा उत्साह या प्रकाशात उसळल्याचे दिसून आले.** (वृत्त पान २ वर..)

## घाटकोपरच्या नारायण नगरमध्ये भीषण आग

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या घाटकोपरमध्ये नारायण नगर परिसरात एका प्लास्टिकचे रॅपर बनवणाऱ्या कंपनीला बुधवारी (दि.९) सायंकाळच्या दरम्यान भीषण आग लागली. नारायण नगरच्या सम्राट शाळेजवळच ही कंपनी असून दाट लोकवस्तीचा परिसर आहे. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.

चिंचोळ्या गल्ल्यांमुळे अग्निशमन दलालाही आग विझवण्यासाठी अडचणी येत होत्या. घटनास्थळावर अग्निशमन दलाच्या १० गाड्या पोहचल्या, तसेच स्थानिक पोलीस, पालिका अधिकारी आणि रुग्णवाहिकाही पोहचली. आगीत अद्याप जखमींची माहिती समोर आलेली नाही. कंपनीच्या गोदाममध्ये ज्वलनशील पदार्थ असल्याने आग भडकत असून आतमध्ये स्फोट होत असल्याची माहिती आली. आगीचे कारणही अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांनी तत्काळ वाहतूक मार्ग बंद केले असून वर्दळ हटविली.

## महाराष्ट्रात मोठा विजय मिळवायचाय!

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जनतेला साद



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेस द्रेषाची सर्वांत मोठी फॅक्टरी बनत आहे, हे गांधीजींनी स्वातंत्र्यानंतर समजून घेतले होते. म्हणून महात्मा गांधींनी काँग्रेस विलीन करा, असे म्हटले होते. काँग्रेस संपली नाही, मात्र देशाला संपवत आहे. महाराष्ट्रातील लोक हे ऐकणार नाहीत. हरियाणात भाजपचा विजय झाला. आता महाराष्ट्रात यापेक्षा मोठा विजय मिळवायचा आहे, अशी साद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील जनतेला दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी (दि.९) महाराष्ट्रात ७६०० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांचे भूमिपूजन केले, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून १० वैद्यकीय महाविद्यालयांचे उद्‌घाटनही केले. त्या वेळी ते बोलत होते.

पीएम मोदी म्हणाले, काँग्रेस संप्रदाय आणि जातीच्या आधारावर निवडणूक लढते. हिंदू समाजात फूट पाडणे आणि त्याला विजयाचा फॉर्म्युला बनवणे, हाच काँग्रेसच्या राजकारणाचा आधार आहे. काँग्रेस 'सर्वजन हिताय-सर्वजन सुखाय' ही भारताची परंपरा दडपत आहे. हिंदूमधील एका जातीचे दुसऱ्या जातीशी भांडण लावणे, हेच काँग्रेसचे धोरण आहे. हिंदूमध्ये जेवढी फूट पडेल, त्यांना तेवढाच फायदा होईल, हे काँग्रेसला माहित आहे. काँग्रेसला कुठल्याही प्रकारे हिंदू समाज पेटवत ठेवायचा आहे. भारतात कुठेही निवडणुका असोत, तेथे काँग्रेस हाच फॉर्म्युला वापरते, मात्र महाराष्ट्रातील जनतेने विकासाचा विचार करून संघटित होऊन महायुतीला मतदान करायला हवे, असे आवाहन केले.

# ‘अपारंपरिक ऊर्जा वापरामुळे भविष्यात विजेचे दर कमी होणार’


**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात सध्या अपारंपारीक ऊर्जेचा वापर एकूण ऊर्जेच्या १६ टक्के होत असून सन २०३० पर्यंत हे प्रमाण ५४ टक्के होणार आहे. यामुळे आगामी काळात विजेचे दर कमी होतील, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.९) केले.

नागपूर येथील वनामती सभागृहात विदर्भ व मराठवाड्याचे पायाभूत सुविधा सक्षमीकरण व विस्तारीकरणाच्या एक हजार ७३४ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ, नागपूर जिल्ह्यातील ३१३ कोटी रुपयाचा विद्युत यंत्रणा बळकटीकरण, पंतप्रधान सुर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत विदर्भातील लाभार्थी ग्राहकांचा सन्मान तसेच मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजने अंतर्गत शेतकऱ्यांचा सन्मान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

या वेळी व्यासपीठावर आमदार ॲड. आशिष जायस्वाल, डॉ. परिणय फुके, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, संचालक (संचालन) अरविंद भादिकर व संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे उपस्थित होते.

नागपूर शहर वेगाने वाढत असून सभोवतालच्या परिसरामध्ये चांगल्या



प्रकारचा अखंडित वीजपुरवठा करण्याला प्राधान्य देण्यात आले असून त्यासाठी वीजेच्या वितरणाचे बळकटीकरण करणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यातील वीज वितरण यंत्रणा बळकटीकरणासाठी ३१३ कोटी रुपयाच्या योजना राबविण्यात येत असल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळणार आहे. त्यासोबतच शहरातील विजेचे जाळे भुमिगत करण्यात येणार असल्यामुळे शहराचे सौंदर्यीकरण वाढणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

त्यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत ४० हजार मेगावॅट स्थापीत क्षमता होती परंतु मागील अडीच वर्षात केलेल्या नियोजनामुळे पुढील पाच वर्षात ४५ हजार मेगावॅट क्षमता अतिरिक्त वाढणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात व राज्यात अखंडित वीज पुरवठा करणे सुलभ होणार आहे.

बळीराजा योजनेंतर्गत आता शेतकऱ्यांचे वीज बील राज्य शासन भरणार आहे. याशिवाय शेतकऱ्यांना कृषीपंपांसाठी लवकरच दिवसा १२ तास वीज पुरवठा करण्यात येणार असल्यामुळे रात्रीच्या वेळी सिंचनाची आवश्यकता राहणार नाही. मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना २.० चे पंतप्रधानांनी स्वागत केले आहे. सौर वीज निर्मीतीचे महाराष्ट्र मॉडल संपूर्ण देशात राबविण्याची सूचना त्यांनी केली आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पंतप्रधान सुर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत राज्यातील दुसरे सौरग्राम पुणे जिल्ह्यातील टेकवडीचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. गावचे सरपंच विठ्ठल शत्रृघ्न शिंदे यांना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन उपमुख्यमंत्र्यांनी गौरव केला.

नागपूर जिल्ह्यातील बळीराजा मोफत वीज योजना व पंतप्रधान सुर्यघर मोफत वीज योजनेतील लाभार्थ्यांचा यावेळी सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महवितरणचे संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे व कार्यकारी संचालक धनंजय औढेकर यांचा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या वेळी प्रादेशिक संचालक (नागपूर परिक्षेत्र) परेश भागवत, कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, सुनिल पावडे, दत्तत्रय पडळकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

# किल्ले प्रतापगड लखलखला

## भवानी मातेच्या प्रतिष्ठापनेनिमित्त मशाल महोत्सव


**पोलादपूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या देदिप्यमान पराक्रमाची साक्ष देणारा किल्ले प्रतापगड मंगळवारी रात्री ३६५ मशालींच्या प्रकाशात उजळून निघाला. भवानी मातेच्या प्रतिष्ठापनेच्या ३६५व्या वर्षांच्या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या मशाल महोत्सवात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिलेल्या शिवभक्त आणि देवीभक्तांचा उत्साह अंधारात उसळल्याचे दिसून आले.

यंदा मशाल महोत्सवाचे पंधरावे वर्ष असुन २०१० या वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेत यंदा मशाल महोत्सवाचे हे आयोजन नवरात्रौत्सवातील शष्ठीच्या दिवशी करण्यात आले. चंद्रकांत तथा आप्पा उतेकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या कार्यक्रमास सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यांच्या हस्ते आई देवीभवानीच्या साक्षीने मशाल प्रज्वलीत करून मशाल महोत्सवाच्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमाळे, महाबळेश्वर तहसीलदार तेजस्विनी पाटील, महाबळेश्वर विद्युत मंडळ शाखा अभियंता रेड्डी वाईचे दिवाणी न्यायाधिश आशिष मारगुडे आणि शशिकांत निचळ, महाबळेश्वरचे पोलीस निरिक्षक सांडभोर व उपनिरीक्षक रौफ इनामदार, रायगड जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे, महाबळेश्वर गटविकास अधिकारी यशवंत भांड, महादेव कांबळे, सुनिल पार्टे, गटशिक्षण अधिकारी आनंद पळसे आदी उपस्थित होते.

स्वराज्य ढोल पथकाच्या गजरात प्रज्वलित केलेल्या मशालींच्या प्रकाशाने संपूर्ण प्रतापगडच शिवभक्त व देवी भक्तांच्या उत्साहाने उजळून निघाला. या वेळी ’जय भवानी, जय शिवाजी’ या जयघोषात अवघा प्रतापगड दुमदुमला. प्रतापगडावरील मशाल महोत्सवास उपस्थित राहण्यासाठी आलेल्या शिवभक्त व देवीभक्तांच्या वाहनांच्या रांगा गडाच्या पायथ्यापासून दोन कि.मी.अंतरावर वाडा कुंभरोशीपर्यंत लागलेल्या दिसून आल्या. दुचाकीस्वारांनाच या वाहतूक कोंडीतून मार्ग काढून प्रतापगडापर्यंत पोहोचता आले तर चारचाकी वाहनांना दोन कि.मी. अंतर चालून गडाच्या पायऱ्या चढाव्या लागणार असल्याने अनेकांनी माघार घेतली.





# पाणदिवे गावात रस्ता कामाचे भूमिपूजन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पाणदिवे गावचा हुतात्मा स्मारकाचा रस्ता १७ वर्षानंतर आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास योजनेंतर्गत १५ लक्ष किमतीचा मंजूर करण्यात आला. त्यानुसार या कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

या कामासाठी पिरकोन ग्रामपंचायतचे सदस्य नितेश पाटील यांनी आमदार महेश यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, उरण पूर्वविभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, उद्योगपती देवेंद्र पाटील यांनी विशेष लक्ष देऊन निधीसाठी आमदार महेश बालदी यांच्याकडे विनंती केली त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन मंगळवार (दि. ८) कामाचा भूमिपूजन झाला.

येत्या पंधरा दिवसाच्या आत काम पूर्ण होईल. या भूमिपूजन सोहळ्यासाठी उरण तालुका भाजप अध्यक्ष रवी भोईर,माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड, सरपंच कलावती पाटील,उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड, सारडे सरपंच रोशन पाटील, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उरण भाजप प्रवक्ते करण ठाकूर, माजी सरपंच के. वाय.गावंड, ज्येष्ठ नेते अजित ठाकूर, द्वारकनाथ पाटील, ग्रामपंचायत सदस्य नितेश पाटील, सदस्या रसिका ठाकूर, भाजप प्रमुख राकेश पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते.

# मोहोपाड्यात विविध विकासकामांचा शुभारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेली वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीला तुटपुंजा फंड मिळत असला तरी ग्रामपंचायत कमिटी विकासाला अधिक प्राधान्य देत असल्याचे दिसून येते.

मोहोपाडा विभागातील सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत,सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्य आकाश अमृत जुईकर हे मोहोपाडा परिसरातील



समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असून सरपंच उमाताई संदिप मुंढे त्यांना सहकार्य करत आहेत. बुधवार दि.९ रोजी आदीवासी वाडीत अंतर्गत गटार तयार करणे, मोहोपाडा बैठक हॉलजवळील गटार बांधकाम करणे, पंचशिलनगर जवळ रस्ता तयार करणे, मोहोपाडा शौचालयाचे डागडुजीकरण करणे या कामांचे भुमिपुजन ग्रामपंचायत सदस्य प्रतिक्षा रोशन राऊत, रसिका राकेश खराडे, आकाश अमृत जुईंकर यांच्याहस्ते करण्यात आले. तर मोहोपाडा आदीवासीवाडी अंगणवाडी समोर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे सरपंच उमाताई संदिप मुंढे, सदस्या प्रतिक्षा रोशन राऊत,सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्य आकाश अमृत जुईंकर,सदस्या ताई पुंडलिक पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच संदिप मुंढे, माजी सरपंच रोशन राऊत माजी सरपंच भाग्यश्री पवार, पत्रकार राकेश खराडे,संतोष मैदर्गीकर, वसंत पवार, पुंडलिक पवार,अनिल गीध,निनाद चोपडेकर, शेडगे आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे नऊ महिलांचा सन्मान

**उरण : बातमीदार**

छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी नऊ महिलांचा (नवदुर्गांचा) सन्मान करण्यात येतो. याही वर्षी संस्थेच्या माध्यमातून रँकर्स अकॅडमी, कोप्रोली चौक, उरण येथे नवदुर्गांचा सत्कार सोहळा मोठा उत्साहात झाला.

प्रीती नायर, डॉ. श्वेता इंगोले, सीमा भोईर, सरोज म्हात्रे, सुगंधा म्हात्रे, सुगंधा पाटील, ॲड. दीपाली गुरव, सुनीता वर्तक, कनिष्का नाईक या नवदुर्गांचा शाल गुलाब पुष्प प्रशस्तीपत्र, सन्मान चिन्ह, साडी देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे उत्तम नियोजन व आयोजन केल्याने उपस्थित महिलांनी उपक्रमाचे कौतुक केले व संस्थेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.



उपक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक सुनील वर्तक, निवेदिका हेमाली म्हात्रे यांनी तर आभार प्रदर्शन सुनिल वर्तक यांनी केले. ज्या महिलांचा सत्कार झाला त्यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करून महिलांच्या विविध समस्या व दैनंदिन जीवनावर प्रकाश टाकला. चांगल्या क्रमांकाचे आयोजन केल्याने उपस्थित महिलांनी आयोजकांचे आभारही मानले. या वेळी व्यासपीठावर आदर्श शिक्षक सुधीर मुंबईकर आदर्श शिक्षिका सुप्रिया मुंबईकर, रँकर्स अकॅडेमीचे अध्यक्ष प्रतीक मुंबईकर, आदर्श शिक्षिका सुनीता वर्तक, महिला सामाजिक कार्यकर्त्यां प्रीती नायर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात सुप्रिया ताई मुंबईकर यांनी महिलांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. महिलांच्या विविध समस्यावर प्रकाश टाकत उपस्थित सर्वांचे आभार मानले.

कार्यक्रमाला आदर्श शिक्षक सुधीर मुंबईकर, सुप्रियाताई मुंबईकर, प्रतीक मुंबईकर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, संपर्कप्रमुख ओमकार म्हात्रे सचिव प्रेम म्हात्रे, माधव म्हात्रे,अजित म्हात्रे, नितेश पवार, हितेश मोरे, आदित्य पाटील, प्रणित पाटील, सागर घरत, प्रकाश म्हात्रे, सचिन म्हात्रे, शुभम ठाकूर, जयदास म्हात्रे, शरद पाटील आदींनी विशेष मेहनत घेतली.

# ‘नवीन पनवेलमधील रस्त्याची डागडुजी करा’

**पनवेल :** नवीन पनवेल परिसरातील प्रभाग क्र.१७, सेक्टर नं.१२ ते १९ मध्ये पावसामुळे रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे तातडीने बुजविण्याची मागणी पनवेल महापालिकेकडे माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात मनोज भुजबळ यांनी म्हटले आहे की, यावर्षीच्या प्रचंड पावसामुळे व वेळोवेळी एजन्सीने केलेल्या खोदकामामुळे नवीन पनवेल पूर्व तसेच पनवेल पश्चिमकडील प्रभाग क्र.१७ मध्ये रस्त्यावर प्रचंड मोठे खड्डे पडले असून लवकरच विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागण्याची शक्यता असून त्यानंतर रस्त्याची कामे, खड्डे बुजविणे केवळ आचारसंहिता आहे, म्हणून काम करता येणार नाही अशी उत्तरे महापालिकेच्या अधिकारी वर्गाकडून मिळण्याची शक्यता आहे. पडलेले खड्डे हे मोठ्या प्रमाणात असून वाहन चालकांसह पादचाऱ्यांना ये-जा करणे मुश्कीलचे बनले आहेत तसेच नेहमीच अपघात घडत आहेत.

वाहतूक कोंडी होत आहे. महापालिकेने लवकरात लवकर खड्डे भरुन घ्यावेत अन्यथा कठोर पाऊले उचलावी लागतील, असा इशारा मनोज भुजबळ यांनी दिला आहे.

पान १ वरुन

## युवक, शेतकरी, विद्यार्थ्यांनाही लाडक्या बहिणींसोबत बळ देणार

दिवाळीपूर्वीच महिलांना भाऊबीज देण्यात आली आहे. आज राज्यातील महिलांच्या खात्यात १७ हजार २०० कोटी रुपये जमा केले आहेत. आतापर्यंत राज्यात दोन कोटी २६ लाखांहून अधिक बहिणींच्या खात्यात रक्कम जमा झाली आहे.

महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांचे कौतुक करून मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महिला व बालविकास विभागाने सचिव अनुपकुमार यांच्या नियंत्रणाखाली अतिशय गतीने योजनेचा लाभ देण्याचे काम झाले आहे. महिला बचत गट, कौशल्य विकास योजना व अन्य योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विविध उद्योगांच्या माध्यमातून त्यांना ताकद द्यायची आहे. आमची बहीण लखपती झालेली पाहायची आहे. लाडक्या बहिणींबरोबरच शासन युवक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी अशा सर्वांनाच बळ देत आहे. त्यासाठी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना या योजनांना गती देण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, आजचा दिवस हा महिला व बालविकास विभागसाठी अभिमानाचा दिवस आहे. नवरात्रीत सर्व देवींची पूजा केली जाते. येथे उपस्थित सर्व महिला देवींच्या लेकी आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार या तिनही लाडक्या भावांनी राज्यातील आपल्या लाडक्या बहिणींना या योजनेच्या माध्यमातून आर्थिक बळ दिले आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. प्रत्येक स्त्री ही आपल्या परिवारासाठी संसारासाठी जगत असते, परंतु मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे आता महाराष्ट्रातील स्त्री ही स्वतः साठी जगणार आहे. ही योजना भविष्यात निरंतर चालावी यासाठी शासनाने आर्थिक नियोजनासह तरतूद केली आहे.

***जखमी महिलांवर तत्काळ उपचार करण्याचे निर्देश***

***रायगडमधील या कार्यक्रमासाठी येणाऱ्या बसला गोरेगावमध्ये अपघात झाला. एक एसटी बस घसरली आहे. या सर्व महिलांवर तत्काळ उपचार करून त्यांना सुखरूप घरी पोहोचवावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.***

## आमदार प्रशांत ठाकूर खऱ्या अर्थाने ‘लोकप्रतिनिधी’ –खासदार बारणे

त्यामुळे नवीन आयुक्त मंगेश चितळे हे उत्तम काम करीत असल्याचे दिसून येते. पनवेल महापालिका ही नवीन असली तरी आज अनेक क्षेत्रात पुढे असल्याचे दिसून येत आहे, असे सांगितले.

सिडकोचे सहव्यवस्थापक गणेश देशमुख यांनी, या वेळी दोन महिन्यांत सिडकोकडे असलेले पनवेल महापालिका हद्दीतील भूखंड व इतर मालमत्तांचे हस्तांतरण पूर्ण करणार असल्याची ग्वाही दिली. आयुक्त मंगेश चितळे यांनी, महापालिकेच्या वाटचालीची माहिती दिली. या वेळी पनवेल महापालिकेच्या कोरोनाविरूद्ध यशस्वी लढा दिल्याबद्दल गौतम कोतवाल यांनी लिहिलेल्या ‘युद्ध एका अज्ञात शत्रूशी’ या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमादरम्यान राज्य स्तर, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरती क्रीडा क्षेत्रात कामगिरी बजवलेल्या मान्यवरांचा या वेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये टेबल टेनिसमधील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त संजय सुदाम कडू, कबड्डीमधील शिवछत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार प्राप्त सुर्यकांत ठाकूर, रायफल शुटींगमधील शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त सिमा शिरूर, पेरू येथील ज्युनिअर वर्ल्ड रायफल शुटिंगमधील चॅम्पियनशिप२०२४ आंतराष्ट्रीय सुवर्णपदक विजेता पार्थ माने, जकार्ता येथील रायफल शुटिंगमधील १५वी एशियन चॅम्पियनशिप २०२४ रौप्यपदक विजेती अन्वी विक्रम रोठोड यांचा सन्मान करण्यात आला.

***भूमिपूजन करण्यात आलेली विकासकामे :***

***१) पनवेल महानगपालिका हद्दीमध्ये एकूण १३४३ अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा***
***२) सफाई कर्मचाऱ्यांसाठी प्रस्तावित गृहप्रकल्प इमारतीचे व पायाभूत सुविधांचे बांधकाम.***
***३) प्रभाग समिती क मधील लायन्स गार्डन ते तहसिल ऑफिस ते एचओसी कॉलनीपर्यंत रस्त्यांचे क्राँकीटीकरण.***
***४) खारघर येथील सेक्टर १२मध्ये नव्याने दैनिक बाजार मच्छीमार्केट बांधकाम.***
***५) बेघरांसाठी रात्र निवारा बांधकाम करणे – खांदा कॉलनी.***
***६) बल्लाळेश्वर मंदिर व रामेश्वर मंदिर येथे प्रवेशद्वार बांधणे व घाटाचे उन्नतीकरण.***
***७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावर मिनी थिएटर बांधकाम.***
***८) अंतिम भुखंड क्रमांक ४१४मध्ये खेळाचे मैदान केंद्र विकसित.***

# नवरात्रीनिमित्त चित्रकला स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या केडी आर्ट्स स्टुडिओ आणि ड्रॉईंग अकॅडमीतर्फे नवरात्री चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती आणि कॅमल आर्ट कंपनीने त्याला समर्थन दिले होते. ही स्पर्धा करंजाडे, येथे झाली. या स्पर्धेत पनवेल आणि नवी मुंबईतील विविध भागातून ३.५ ते १६ वर्षे वयोगटातील ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचे निरीक्षण केविन डायस यांनी केले. जे व्यावसायिक चित्रकार आणि केडी आर्ट्स स्टुडिओ आणि ड्रॉईंग अकॅडमी, पनवेलचे संस्थापक आहेत. स्पर्धकांना देवी दुर्गेचे चित्र रंगविण्याचे काम देण्यात आले होते. गट एमध्ये प्रथम ओम स्वामी, द्वितीय सुवेच्छा साहा,



तृतीय आरुष बंथिया तर गट बीमध्ये प्रथम श्रेयस गुरव, द्वितीय हृतिका जैन, तृतीय गौरव जाधव तसेच गट सीमध्ये प्रथम हृतिका खारदिकर, द्वितीय भार्गवी भोईर, तृतीय गार्गी पाटील यांनी उत्कृष्ट रंगकामासाठी विजेते म्हणून निवड करण्यात आली.

डायना गायकवाड, कुणाल गायकवाड, रघुनाथ नेरुरकर, हसन शेख यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. सर्व सहभागी स्पर्धकांना कॅमल आर्ट कंपनीच्या सौजन्याने प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.

# महात्मा फुले महाविद्यालयाला महिला कबड्डी स्पर्धेत ‘सुवर्ण’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या मुंबई झोन क्र. १ च्या आंतरमहाविद्यालयीन महिला कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली.



रश्मी पाटील, रुपाली जाधव, ममता चव्हाण, पायल निगडे, अंकिता घारे, दीपिका गड्डे, तनिषा मोरे, एकता पाटील, विनंती चव्हाण, अमृता कदम, मानसी पाटील, शांभवी मोरे अशा बारा खेळाडूंचा या संघात समावेश होता. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मुलींच्या या संघातील रश्मी मच्छिंद्र पाटील, रूपाली उमेश जाधव, ममता विजयकुमार चव्हाण व पायल संतोष निगडे या चार खेळाडू मुंबई विद्यापीठाच्या आंतरविभागीय स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी पात्र ठरल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले की, मागील काही वर्षापासून महाविद्यालयातील मुलींच्या संघाने कबड्डी या क्रीडाप्रकारात मुंबई विद्यापीठात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत आपला दबदबा निर्माण केला आहे. या संघाने आपल्या यशात सातत्य राखत या वर्षी सुवर्णपदकाला गवसणी घातली, या गोष्टीचा मला खूप अभिमान वाटतो. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ‘रयत’चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर आदी मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यासोबतच समाजाच्या विविध स्तरांतून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य डॉ. नामदेव पवार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, रजिस्ट्रार अनंता जाधव, प्रा. सुनील अवचिते, डॉ. यशवंत उलवेकर, प्रा. प्रवीण गायकर, प्रशिक्षक अक्षय जितेकर, तेजा महादेव सपकाळ व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी मार्गदर्शन केले.





**पनवेल : तालुक्यातील विचुंबे गावाजवळ गाढी नदीवर उभारण्यात आलेल्या नवीन पुलाचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या यांच्या हस्ते बुधवारी झाले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला उपस्थित होत्या.** (वृत्त उद्याच्या अंकात)

## भाजप अनुसूचित जाती मोर्चा ग्रामीण विभागाची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप अनुसूचित जाती मोर्चा ग्रामीण विभाग मंडलाची बैठक मंगळवारी (दि.८) भाजप मध्यवर्ती कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.



या वेळी घेण्यात येणाऱ्या आगामी अनुसूचित जाती महिला मेळावा व येणाऱ्या आगामी विधानसभा निवडणूक या विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. या बैठकीस निरिक्षक म्हणून गोव्याचे माजी आमदार दयानंद सोपटे, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, विस्तारक सागर मोरे यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीस भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, पनवेल ग्रामीण, तालुका व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्टार्टअप आयडिया स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि.९) अकाउंट व फायनान्स व उद्योजकता विकास सेल यांच्या संयुक्त विद्यमाने स्टार्टअप आयडिया स्पर्धचे आयोजन केले होते.



या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील वाणिज शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वेगवेगळ्या व्यावसायिक संकल्पना सादर केल्या. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. अर्पिता नायत यांनी काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

या स्पर्धचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा व प्रा. तनुजा यांनी केली तसेच प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे व प्रा. मनोज यादव, प्रा. योगिता पाटील प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. आनंद शेलार व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

दरम्यान, खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

## बेवारस वाहनांबाबत आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या पोलीस ठाण्यात बरेच दिवसा पासून विविध गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली वाहने आहेत.

गुन्ह्यातील वाहनांच्या मालकाचा शोध घेणे होण्याकरिता वाहनाच्या वर्णनाची माहिती तसेच वाहन मालकांचे नाव व पत्ता मिळाल्यास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते तळोजा पो.ठाणे (०२२/२७४१२३३३) मो. नं. ८१०८६००१७०, पोलीस निरीक्षक(गुन्हे) रमेश जाधव (९८२१५५९२६६) पोहवा/१०७८ , निवळे (९०८२१२५१४१) यांचेशी व्यक्तीशा अगर मोबाईल फोनवर संपर्क साधणे बाबतची अशी माहिती तळोजा पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांनी यानी एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.



# संपादकीय


## शांतता टिकणे महत्त्वाचे

जम्मू–काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीचा निकाल अपेक्षेनुसारच लागला आहे. मेहबूबा मुफ्ती यांच्या पीडीपी पक्षावर काश्मिरी जनतेचा अजिबात विश्वास उरलेला नाही हे जसे तेथील निकालांतून स्पष्ट झाले तसेच काँग्रेसला तेथे मिळालेल्या अवघ्या सात जागादेखील नॅशनल कॉन्फरन्सच्या बळावरच आहेत हेही लक्षात घ्यावे लागेल. जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा बहाल करण्याबाबत केंद्र सरकार अनुकूल असले तरी अंतिमत: तेथे परिस्थिती कशी राहते याच्यावरच ते अवलंबून असणार आहे.

**जम्मू आणि काश्मीरमधील विधानसभा निवडणुकांच्या निकालांपेक्षाही तेथील निवडणुकीतून समोर आलेली महत्त्वाची बाब ही आहे की तेथील तिन्ही टप्प्यातील मतदान शांततेत पार पडले असून कुठेही फेरमतदान घ्यावे लागले नाही. या निवडणुकीत तेथे सरासरी ६८ टक्के मतदान झाले असून मतदानादरम्यान हिंसाचाराची एकही घटना नोंदली गेली नाही ही अतिशय समाधानाची बाब आहे. कलम ३७० रद्द झाल्यानंतर तसेच जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेश बनल्यानंतर पाच वर्षांनी तेथील जनतेच्या हाती पुन्हा एकदा सत्ता सुपूर्द होते आहे. यामुळे तेथे शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यात आणखी मदत होईल अशी अपेक्षा आहे. तेथील यापूर्वीच्या चार विधानसभा निवडणुकांचा विचार केला असता, फक्त १९९६मध्ये नॅशनल कॉन्फरन्सला जनतेचा स्पष्ट कौल मिळाला होता. त्यानंतर २००२, २००८ आणि २०१४मध्ये त्रिशंकू विधानसभेमुळे तेथे आघाडी सरकारचीच स्थापना झाली होती. यावेळीही त्रिशंकू विधानसभेची चर्चा होतीच, पण निकाल बऱ्यापैकी अपेक्षेनुसारच लागले आणि काश्मीर खोऱ्यात नॅशनल कॉन्फरन्स हा प्रमुख पक्ष म्हणून समोर आला आहे. अपक्ष आणि फुटीरतावादी नेत्यांना तेथील जनतेने नाकारल्याचेही यंदाच्या निवडणुकीत दिसून आले. काँग्रेसचे उमेदवारही तेथे नॅशनल कॉन्फरन्स या सहकारी पक्षाच्या साह्यानेच निवडून आले आहेत. निवडणुकांनंतर जम्मू आणि काश्मीरमधील वातावरण कसे राहते यातून त्या प्रदेशाचे यापुढील भवितव्य ठरणार आहे. निवडणुकांमुळे सुरक्षा प्रस्थापित होत नाही. यापूर्वीच्या आघाडी सरकारांमध्येही एकमेकांशी जुळवून घेण्यात अडचणी दिसून आल्या होत्या. आता नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस एकमेकांसोबत कशी वाटचाल करतात हे येत्या काळात दिसेलच. नॅशनल कॉन्फरन्स पक्ष सतत कलम ३७० पुन्हा पूर्ववत लागू करण्याविषयी बोलत आला आहे. यातूनच या आघाडीतील दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. संपूर्ण संसदीय प्रक्रिया पार पाडून हे कलम हटविण्यात आले आहे. वास्तवत: नॅशनल कॉन्फरन्सलाही याची पूर्ण कल्पना आहे. परंतु तरीही राजकारणाचा भाग म्हणून हा पक्ष हे वास्तव मान्य करत नाही. काँग्रेस पक्षाने कलम ३७० पुन्हा लागू करण्याची भाषा केलेली नाही. परंतु ते संबंधित निर्णयास पाठिंबाही दर्शवित नाहीत. काश्मीर खोऱ्यातील काही मुस्लिमांमध्ये कलम ३७० चा मुद्दा अद्यापही भावनिक महत्त्व टिकवून आहे. यातूनच नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस यांच्यात तसेच या आघाडीच्या केंद्र सरकारसोबतच्या संबंधात मतभेद निर्माण होऊ शकतात. केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारने वेळोवेळी जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा बहाल करण्याविषयी अनुकूलता व्यक्त केली असली तरी अंतिमत: हे तेथील वास्तवातील परिस्थितीवर अवलंबून आहे. ताज्या निकालांमुळे जम्मू प्रदेशात पुन्हा एकदा काश्मीरपासून वेगळे होण्याची मागणीही जोर धरू शकते. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाला जम्मूतील नागरिकांच्या गरजांचा संवेदनशीलतेने विचार करावा लागेल.**

# चौलचे आंग्रेकालीन एकविरा भगवती मंदिर

इतिहासकालात विदेश व्यापारांशी संलग्न असलेल्या चौलमध्ये प्रसिद्ध अशी ३६० मंदिरे व ३६० तलाव असल्याची नोंद सापडते. चौल रामेश्वर, चौल शितळादेवी, हिंगुळजा देवी, मुखरी गणपती, महालक्ष्मी, चंपावतीदेवी, चौल कुडेश्वर मंदिर, रेवदंडा हरेश्वर मंदिर, रेवदंडा मारूती मंदिर आदी मंदिरे अद्यापी इतिहासाची साक्षीदार आहेत, परंतु कान्होजी आंग्रेंच्या उत्तर काळखंडात लक्ष्यवेधी ठरलेले चौलचे एकविरा भगवती मंदिर आंग्रेकालीन बांधकामाचा उत्कृष्ट नमुना असून चौलमधील दुसऱ्या क्रमांकाचे प्रसिद्ध, ऐतिहासिक मंदिर म्हणून ओळखले जाते.



अलिबागपासून १८ किमीवर असलेल्या चौलनाका येथून चौल भोवाळे व आग्राव–शितळादेवीकडे जाण्याचा मार्ग आहे. या दोन्ही मार्गांनी भगवती आळीत चौलच्या प्रसिद्ध एकविरा भगवती मंदिराकडे जाता येते. चौलभोवाळे येथून पर्वतवासी दत्त मंदिराकडे जाण्याच्या रस्त्याच्या थोडा पुढे आग्राव व बेलाई चौलकडे जाण्याचा मार्ग असून या मार्गातच पाच मिनिटांच्या अंतरावर हे मंदिर आहे, तर चौल शितळादेवीकडे जाण्याच्या मार्गात तेथूनच चौल बेलाईमार्गे महाकाली मंदिरासमोरून गेलेल्या रस्त्यानेसुद्धा या मंदिरात जाता येते, परंतु जाण्यासाठी चौल भोवाळे येथून एकविरा भगवती मंदिराकडे जाणारा मार्ग सोपा आहे. या दोन्ही मार्गाने चारचाकी वाहनांनी जाता येते.

चौलचे एकविरा भगवती मंदिर केव्हा बांधण्यात आले यांचे लिखित सापडत नाही, परंतु आंग्रेकाळात या मंदिराचा जिर्णोद्धार झाल्याचे नोंद येथील मंदिराच्या गाभाऱ्याच्या वरील बाजूच्या तुळईवर पाच संस्कृत भाषेत कोरले आहे. त्यानुसार या मंदिराचे जिर्णोद्धाराचे काम शके १६७३, फाल्गुन शु.७ (इ.स१७५२) साली झाल्याचे समजते. या मंदिराचे सभोवताली अर्ध तुटलेली तटबंदी असलेली दिसून येते. त्यामुळे पूर्वी या मंदिराच्या सभोवताली संरक्षणासाठी मजबूत तटबंदी असावी, असे दिसते, तसेच आंग्रेच्या उत्तर काळात या मंदिराचा उपयोग अनेकदा किल्ल्यासारखा केल्याचा लिखीत उल्लेख आढळतो. या एकविरा भगवती मंदिराने आंग्रे याच्या दुसऱ्या यादवीत बराच रक्तपात पाहिला असून सन १७९६मध्ये मानाजी व जयसिंगराव आंगरे यांच्यातील तुंबळ युध्दात मानाजीचा बिमोड झाला, असे लिखित आहे.

एकविरा भगवती मंदिर व मुर्ती पुर्वाभिमुख असून मंदिर संपूर्णपणे लाकडी व कौलारू असून समोरील ओसरीचा प्रशस्त हॉल पूर्णपणे दगडी बांधकामाचे आहे. हा ओसरीचा प्रशस्त हॉल दगडी खांबावर उभारण्यात आला आहे. या दगडी खांबावर उभारलेल्या ओसरीचा प्रशस्त हॉलच्या वरील बाजूकडे व मंदिरात प्रवेश करताना आंग्रेकालीन वास्तू लाकडी कलाकृतीवर नक्षीकामाचा उत्कृष्ट नमुना पाहण्यासारखा आहे. मंदिरात आत प्रवेश करतानाच भव्य व दिव्य लाकडी बांधकामाचा सभागृह आल्हाददायक वाटतो, मंदिराचे आतील भागात पूर्णपणे सागवानी लाकडावर उभारलेले असून मंदिराचा सभागृह १० सागवानी लाकडी खांबावर उभारलेले आहे. या लाकडी खांबावरील नक्षीकामसुद्धा निश्चित लक्ष्य वेधून घेते. मंदिराचा जिणोद्धारास २००–३०० वर्षे झाली असूनसुद्धा या सागवानी लाकडी खांबाने अद्याप मंदिराच्या सभागृहाचा डोलारा मजबुतीने सांभाळला आहे. मंदिराचा वरील भाग चौपाकी कौलारू असून देवीचा गाभारा लाकडी व दगडी बांधकामाचा आहे. आंग्रेकालीन लाकडी व दगडी बांधकामाचा उत्कृष्ट नमुना पहाण्याची निश्चित संधी भाविक व पर्यटकांना येथे मिळते. या मंदिरात लाकडी व दगडी गाभाऱ्यात एकविरा भगवती मातेची भव्य व मनमोहक मुर्ती मनाला शांती व समाधान देते व भाविक व पर्यटक निश्चितपणे देवीसमोर नतमस्तक होतो.

या मंदिरात देवीच्या गाभाऱ्याच्या उजव्या बाजूस श्री गणेश व श्री विष्णू यांच्या मूर्ती असून सभामंडपात मध्यभागी कुंड आहे. या मंदिरात एक वेगळीकता जाणवते. मंदिरातील प्रशस्त सभागृहात आंग्रेकालीन लाकडी वास्तू कलेचे नक्षीकाम व दगडी बांधकाम पहाताना खुपच आल्हाददायक वाटून एक वेगळी शांती व समाधान येथे प्राप्त होतो. हे मंदिर आगरी व कोळी समाजाचे दैवत असून नित्याने भाविक व पर्यटकांची गर्दी असते. मंदिराचा प्रवेशद्वार व चबुतरा (पार) नजीकच्या सन २०११ व २०१२ सालात मधुकर गणपत वर्तक यांनी आई–वडिलांच्या स्मरणार्थ बांधले आहे. या मंदिराची पुजाअर्चा येथील भगवती ग्रामस्थ करीत असून या वर्षी पुजेचा गुरवाचा मान पराग वर्तक व आकाश वर्तक यांचा सुरू आहे. या मंदिराचा श्री एकविरा भगवती देवी देवस्थान ट्रस्ट असून या ट्रस्टचे निशिकांत वासूदेव कुलकर्णी, किशोर रामकृष्ण कुलकर्णी व डॉ. क्षितीजा सुदेश राव असल्याचे फलक मंदिरात लावण्यात आला आहे.

या मंदिरात वर्षातील तीन वेळा मंदिरात देवीचे घटपुजन होते. पूर्वी येथे नवरात्र उत्सवामध्ये फार मोठी जत्रा भरत असे, परंतु काळाच्या ओघात या यात्रेचे स्वरूप कमी झाले, मात्र या मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.

**–महेंद्र खैरे, रेवदंडा**

# पाच गावांची जागृत ग्रामदेवता श्री नांदाई माता

पनवेल–उलवे–बेलापूर मार्गावरील तरघर, कोंबडभुजे, मोहा, गणेशपुरी, उलवे या पाच गावांची जागृत ग्रामदेवता नवसाला पावणारी नांदाई माता म्हणून प्रसिद्ध आहे. सुमारे १५० वर्षांपूर्वी नांदाई मातेचे मंदिर एक छोट्याशा दगडावर दगड रचलेले दगडी भिंतीचे मंदिर देवीचा समोरील गाभारादेखील दगडाचा, त्यासमोर साडेचार ते पाच फुटाची दगडावरील देवी म्हणजे नांदाई माता.

देवळाची उंचीदेखील सहा ते सात फुटांची. त्यामुळे देवीच्या दर्शनाला जाताना वाकूनच जावे लागत असे, तसेच मंदिराला दरवाजाही नव्हता. मंदिरात गेल्यावर दिवा सोडला तर सगळीकडे अंधारच असायचा. अशा परिस्थितीत पाच गावांतील काही नांदाई भक्त नित्यनेमाणे न चुकता दर्शनाला जायचे. बऱ्याच वर्षांनंतर ग्रामस्थांनी विचार करून नांदाई मातेचे मंदिर जीर्ण झाले आहे तेव्हा त्याचा जिर्णोद्धार करूया या दृष्टीने विचार करू लागले व ग्रामस्थांनी देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा ठाम निर्णय घेऊन १९८० ते ८१च्या दरम्यान नांदाई माता मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. मंदिर साकारल्यामुळे पनवेल अगर बेलापूरकडे जाणारे भाविक रस्त्यालगत असलेल्या नांदाई मातेचे दर्शन घेऊनच पुढे जायचे कारण भक्तांच्या नवसाला पावणारी आई म्हणून नांदाई मातेची ख्याती होती.



आगरी, कोळी व कराडी समाजाच्या हाकेला धावणारी व मनोकामना पूर्ण करणारी अशी नांदाई मातेची जनमानसात ख्याती आहे.

नांदाई माता या मंदिरात दरवर्षी चैत्रवद्य सप्तमीला मोठी जत्रा भरते. मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनाला आल्याने याठिकाणी यात्रेचे स्वरुप येते. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून दसऱ्यापर्यंत नवरात्रोत्सव भक्तीभावाने साजरा केला जातो. या काळात देवी महात्मे ग्रंथवाचन, प्रवचन, हरिपाठ, भजन, देवीची गाणी साजरी करुन जागरण केले जाते. या कार्यक्रमास पाच गावातील ग्रामस्थ एकत्र येऊन नवरात्रोत्सव साजरा करण्याची परंपरा कायम आहे.

**–संजय कदम, पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएलकडून स्पॅम कॉल्स टाळण्यासाठी नवीन फीचर लाँच

एअरटेल, जिओ आणि व्होडाफोन–आयडिया कंपन्यांद्वारे रिचार्ज प्लॅनमध्ये वाढ केल्यानंतर अनेक ग्राहकांनी बीएसएनएलकडे आपला मोर्चा वळविला आहे. रिचार्ज प्लॅन महाग झाल्यानंतर अनेकांनी बीएसएनएलमध्ये मोबाईल नंबर पोर्ट केले आहेत. दरम्यान, कंपनी ग्राहकांसाठी सतत नवीन योजना आणत आहे व ग्राहकांना जुन्या किमतीत स्वस्त रिचार्ज प्लॅन देत आहे.

बीएसएनएल सतत ४जी नेटवर्कवर काम करीत आहे. स्वस्त रिचार्ज प्लॅन आणि ४जी नेटवर्कनंतर आता बीएसएनएलने आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन सेवा सुरू केली आहे. सततच्या स्पॅम कॉल्सच्या समस्येमुळे ग्राहकांना होणारा त्रास लक्षात घेत कंपनीने ही नवीन सेवा सुरू केली आहे. ग्राहक कंपनीच्या सेल्फकेअर ॲपवर स्पॅम कॉल्स आणि स्पॅम मॅसेजबद्दल तक्रार नोंदवू शकतात.

स्पॅम कॉल्स टाळण्यासाठी बीएसएनएलने एक उत्तम मार्ग अवलंबला आहे. आता तुम्ही तुमच्या बीएसएनएल नंबरवर येणाऱ्या स्पॅम कॉल्स आणि मेसेजबद्दल लगेच तक्रार करू शकता. यासाठी तुम्हाला कंपनीचा सेल्फकेअर ॲप मदत करणार आहे. बीएसएनएल ग्राहक सेल्फकेअर ॲपच्या मदतीने स्पॅम कॉल्स आणि मेसेजबद्दल तक्रार नोंदवू शकतात.

दरम्यान, सध्या स्पॅम कॉल आणि मेसेजची समस्या प्रचंड वाढली आहे. याबाबत दूरसंचार विभागानेदेखील अनेकदा कठोर पावले उचलली आहेत. फेक कॉल्स, मेसेजला आळा घालण्यासाठी 'ट्राय'ने १ ऑक्टोबरपासून नवीन नियम लागू केले आहेत. आता ग्राहकांना येणारे फेक कॉल्स, मेसेज ऑपरेटर स्तरावरच ब्लॉक केले जातील. ट्रायने घोटाळेबाजांना जोरदार झटका दिला असून गेल्या काही दिवसांत १८ लाखांहून अधिक मोबाईल नंबर्स व ६८० एंटिटीज (संस्थांना) ब्लॉक केल्या आहेत.

सर्वप्रथम तुमच्या फोनवर BSNL सेल्फकेअर ॲप ओपन करा. आता तुम्हाला स्क्रीनच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात असलेल्या तीन डॉटच्या आयकॉनवर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला खाली स्क्रोल करावे लागेल आणि Complaint and Preference पर्याय निवडावा लागेल. नंतर उजवीकडे तीन–लाइन मेनू टॅप करा आणि रिपोर्ट करा. आता तुम्हाला New Complaintवर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्हाला एसएमएस किंवा व्हॉईस कॉलमधील पर्याय निवडावा लागेल आणि नंतर संपूर्ण माहिती द्यावी लागेल. शेवटी माहिती भरल्यानंतर तुम्हाला सबमिट बटणावर क्लिक करावे लागेल.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन



**निमित्त**

दरवर्षी १० ऑक्टोबर हा जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानसिक आरोग्यासंबंधित समस्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि मानसिक आरोग्य जपण्यासाठी जागतिक पातळीवर साजरा केला जातो. मानसिक आरोग्याचे महत्त्व पटवून देणे, मानसिक आरोग्याबाबत लोकांना शिक्षित आणि जागरूक करणे आणि त्यासाठी आवश्यक धोरणांना समर्थन करणे हे हा दिवस साजरा करण्यामागचे उद्दिष्ट आहे.

जागतिक मानसिक आरोग्य दिन १० ऑक्टोबर १९९२ रोजी १५०हून अधिक देशांमध्ये सक्रिय असलेल्या जागतिक मानसिक आरोग्य संघटनेच्या प्रयत्नांमुळे १० ऑक्टोबर १९९२ रोजी सुरू झाला. वर्ल्ड फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे डेप्युटी सेक्रेटरी जनरल रिचर्ड हंटर यांनी १९९२मध्ये हा उपक्रम प्रस्तावित केला होता. विविध माध्यमांवर मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जागरूकता निर्माण करणे, मानसिक आरोग्याच्या समस्या असणे म्हणजे कोणताही कलंक नाही हे पटवून देणे आणि मानसिक आरोग्य कसे जपावे याबाबत चर्चा करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या दिवशी केले जाता. एखाद्या व्यक्तीला किंवा एखाद्या समाजाला, मानसिक आरोग्य आणि त्याचा लोकांच्या आयुष्यावर होणारा परिणाम आणि मदतीसाठी उपलब्ध साधनांबाबत शिक्षित करणे हे यामागील ध्येय आहे

मानसिक आरोग्यासंबंधित अडचणी दूर करणे, मानसिक आरोग्याबाबत जागरूक आणि संवेदनशील समाज निर्माण करणे आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे आवश्यक लक्ष आणि महत्त्व दिले जावे हे जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे उद्दिष्ट आहे. आपण सामना करीत असलेल्या मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जास्तीत जास्त संवाद साधणे हादेखील हा दिवस साजरा करण्याचा एक मार्ग आहे. मानसिक आरोग्याच्या अनेक समस्यांपैकी एक म्हणजे नैराश्य. नैराश्य हा एक मानसिक आरोग्याचा आजार आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीला सातत्याने दुःखी असल्याची भावना जाणवते. आपली कोणालाही गरज नाही असे वाटते, जगण्यासाठी किंवा कोणतेही काम करण्यासाठी उत्साह वाटत नाही आणि आनंद मिळेल अशा गोष्टी करण्यात रस नाही असे वाटते. त्यामुळे एखाद्या व्यक्तीला रोजच्या जीवनातील सामान्य गोष्टी करण्यासाठी अडथळा येऊ शकतो आणि विविध प्रकारची शारीरिक आणि मानसिक लक्षणे दिसू शकतात.


यापैकी काही लक्षणे जाणवत असल्यास नैराश्य असेल असे नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कारण प्रत्येकाच्या आयुष्यात चांगले–वाईट दिवस येत असतात, पण जर ही लक्षणे दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त काळ सातत्याने जाणवत असतील. तुमच्या दैनंदिन कार्यावर परिणाम होत असेल तर डॉक्टरांची मदत घेण्याचा सल्ला दिला जातो.

१९९४पर्यंतच्या सुरुवातीच्या वर्षांमध्ये हा दिवस विशिष्ट थीमशिवाय साजरा केला गेला. प्रामुख्याने सामान्य मानसिक आरोग्य समस्यांबद्दल लोकांना शिक्षित करण्यावर लक्ष केंद्रित केले. १९९४मध्ये जागतिक फेडरेशन फॉर मेंटल हेल्थचे तत्कालीन सरचिटणीस यूजीन ब्रॉडी यांच्या मार्गदर्शनाखाली हा दिवस थीम असलेल्या उत्सवात बदलला.

दरवर्षी हा दिवस नवीन थीमसह साजरा केला जातो. यंदाची थीम आहे 'कामाच्या ठिकाणी मानसिक आरोग्याला प्राधान्य.' तुमचे सहकारी, प्रियजन किंवा तुम्ही ज्यांच्याजवळ आहात त्यांना हे कळू द्या की, तुम्ही त्यांच्या मानसिक आरोग्याला प्राधान्य देता.

**क्लिक...क्लिक...!**





**मुरूड : येथील खोकरी येथे जंजिरावर राज्य करणाऱ्या शासकांच्या ५०० वर्षे जुने तीन दगडी थडगे आहेत. या थडग्यांची धाटणी अतिशय रेखीव असल्याने अनेकदा पर्ययक येथे छायाचित्रणाचा आनंद घेत असतात. (छाया : आदित्य वैद्य)**



## आरोग्य प्रहर

### 'या' १२ केकच्या सेवनाने होऊ शकतो कॅन्सर



चॉकलेट केक, पाईनापल केक, ब्लू बेरी, रेड वेल्वेट केक, ब्लॅक फॉरेस्ट केक अशा विविध केकची नावे ऐकून तुमच्याही तोंडाला पाणी सुटले असेल. अनेकांना केक खायला प्रचंड आवडतो. कोणाचा वाढदिवस असू द्या किंवा एखादे चांगले काम जरी झाले तरी आजकाल केक कापून तो साजरा करण्याचा ट्रेंड आहे, पण तुम्हाला माहीत आहे का? केक खाल्ल्याने कॅन्सरसारखे गंभीर आजार होऊ शकतात. अलिकडेच कर्नाटक अन्नसुरक्षा आणि गुणवत्ता विभागाच्या अभ्यासात रेड वेल्व्हेट आणि ब्लॅक फॉरेस्टसारख्या केकच्या चाचणीमध्ये २३५पैकी १२ केक नमुन्यांमध्ये कर्करोगजन्य घटक आढळून आले आहेत. अन्नसुरक्षा आयुक्त श्रीनिवास के. यांनी राज्यभरातील बेकरींना ते वापरत असलेल्या घटकांबद्दल अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. विशेषत: हानिकारक रसायने आणि कृत्रिम रंगाच्या वापराविद्धद्ध इशारा दिला आहे.

कर्नाटक सरकारचे म्हणणे आहे की, एकूण २३५ केक नमुन्यांपैकी २२३ सुरक्षित आढळले आहेत, परंतु १२ केकमध्ये धोकादायक पातळीवर कृत्रिम रंग असल्याचे आढळले आहे. त्यामुळे कॅन्सरसारख्या आजारांचा धोका असतो. कर्नाटकच्या अन्न सुरक्षा विभागाच्या म्हणण्यानुसार रेड वेल्वेट आणि ब्लॅक फॉरेस्ट केक, जे लोक मोठ्या उत्साहाने खातात ते तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकतात.

अन्नसुरक्षा आयुक्त श्रीनिवास यांनी सांगितले की, विविध बेकरीमधील नमुन्यांवर केलेल्या चाचण्यांमध्ये केकच्या विशिष्ट प्रकारांमध्ये कृत्रिम रंग जास्त प्रमाणात आढळून आले. गोबी मंचुरियन, कबाब आणि पाणीपुरी सॉस यांसारख्या पदार्थांमधील कृत्रिम रंगांवर विभागाच्या मागील बंदीनंतर आता केकसाठी हा इशारा देण्यात आला आहे.

दिल्लीच्या सीके बिर्ला हॉस्पिटलच्या डायरेक्टर, डॉ. मनीषा अरोरा यांनी या संदर्भात सविस्तर माहिती देत संबंधित संभाव्य आरोग्य धोके स्पष्ट केले आहेत. कृत्रिम रंग मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात वापरल्यास नुकसान होऊ शकते. हेच रंग कर्करोगाचा धोका वाढवू शकतात आणि हार्मोनल व्यत्यय, रोगप्रतिकारक शक्ती कमजोर करण्यासारख्या इतर आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. अशा केकचे अधूनमधून सेवन केल्याने कमीत कमी धोका निर्माण होऊ शकतो, मात्र नियमित सेवन केल्याने दीर्घकालीन आरोग्यावर लक्षणीय परिणाम होऊ शकतात. विशेषत: लहान मुलांवर, ज्यांचे विकसनशील शरीर विषारी द्रव्यांसाठी अधिक संवेदनशील असते.

# माथेरानमध्ये धोकादायक विद्युत खांब हटविण्याची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये अनेक ठिकाणी विद्युत खांब गंजलेले तसेच जीर्ण झालेले आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे तक्रार करण्यात आली आहे. त्यामुळे पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

डोंगरमाथ्यावर वसलेल्या माथेरानमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होते. वादळी वाऱ्यामुळे मोठ-मोठी झाडे तसेच विद्युत खांब पडण्याच्या घटनाही वारंवार घडतात. दोन महिन्यांपूर्वी झाडे तसेच विद्युत खांब उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या आहेत शहरातील अनेक भागांत विद्युत खांब गंजले आहेत. शास्त्री हॉल नाका येथील ई-रिक्षा थांब्याजवळील तीन विद्युत खांब पडण्याच्या स्थितीत आहेत. याठिकाणी कायम वर्दळ असते, त्यामुळे



येथे दुर्घटना घडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता आहे.

महावितरणचे अधिकारी कर्मचारी दररोज या ठिकाणाहून ई-रिक्षाने प्रवास करतात, मात्र अद्याप त्यांचे गंजलेल्या खांबाकडे लक्ष गेलेले नाही. तक्रार केली तरी अधिकारी केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत जाणून घेण्यासाठी महावितरणच्या उपअभियंत्याशी संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

**जीर्ण झालेल्या खांबाच्या बाजूलाच ई-रिक्षा स्टँड आहे. हजारो पर्यटकांची दररोज याठिकाणी वर्दळ असते. शालेय विद्यार्थी याच थांब्यावरून प्रवास करतात. खांब पडून दुर्घटना झाली तर त्याला जबाबदार कोण? महावितरणने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गंजलेले खांब तातडीने बदलावे.**

**-शकील पटेल,**
**अध्यक्ष, रिक्षा संघटना**

# नागोठण्यात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष

**नागोठणे : बातमीदार**

हरियाणा राज्यात बहुमताने भाजपची सत्ता आल्यामुळे नागोठणे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष साजरा करण्यात आला.

दरम्यान, या वेळी उपस्थित कार्यकर्त्यांना रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, शहर अध्यक्ष सचिन मोदी व जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे यांनी मार्गदर्शन करून हरियाणप्रमाणे महाराष्ट्रातदेखील आपल्याला महायुतीची सत्ता आणण्यासाठी सर्व मिळून जोमाने कामाला लागू व विकासकामांच्या जोरावर महाराष्टात निश्चितच भाजपची सत्ता येईल, असा विश्वास व्यक्त केला.

हरियाणा राज्यात बहुमताने भाजपची सत्ता आल्यामुळे नागोठणेत विजयाचा जल्लोष साजरा करताना ज्येष्ठ नेते अनंत वाघ, जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, रोहा तालुका सरचिटणीस एकनाथ ठाकूर, शहराध्यक्ष सचिन मोदी, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, सिराज पानसरे, रोहा तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, रोहा महिला मोर्चा अध्यक्ष अपर्णा सुटे, रोहा शिक्षण सेल अध्यक्ष अशोक अहिरे, रोहा तालुका शिक्षण सेल उपाध्यक्ष धनराज उमाळे, शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, नागोठणे शहर उपाध्यक्ष गौतम जैन, अ‍ॅड. रमेश जाधव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.




## कागदपत्रे हरविल्याबाबत

मी, श्री. जयसुख नानजी मकवाना, अनुज्योट सेंट्रल गव्हर्नमेंट एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेडचा सदस्य, राहणार रूम क्र. ०७, पहिला मजला, प्लॉट क्र. २४, सेक्टर १५, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९.

माझ्याकडून मूळ शेअर सर्टिफिकेट, अ लोटमेंट लेटर आणि पझेशन लेटर कुठेतरी गहाळ झालेली आहेत. त्याबाबत मी कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे मिसिंग कंप्लेंट नोंद केली आहे. नंबर २०६५/२०२४ दिनांक : ७/१०/२०२४ त्याप्रकारचा मिसिंग कंप्लेंटचा दाखला घेतला आहे.

गहाळ झालेल्या कागदपत्रांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

शेअर सर्टिफिकेट क्र. ४ साठी ५ शेअर्स असणारे क्रमांक - ते - रू. २५०/-

अलोटमेंट लेटर तारीख २२/११/१९९३

पझेशन लेटर

गहाळ सर्टिफिकेट जर आजच्या तारखे पासून येणाऱ्या १४ दिवसात मिळाले नाही तर अनुज्योट सेंट्रल गव्हर्नमेंट एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड यांनी दुसरी प्रत (डुप्लिकेट) बनवून मला देण्यात यावी.

वरील प्रकारची कागदपत्रे कुणाला सापडल्यास त्यांनी कृपया फोन नं. ९९६९७५३१८० अ‍ॅड आदित्य कटकदौंड यांना संपर्क साधावा.

दिनांक : ०९/१०/२०२४.
ठिकाण: कोपरखैरणे.

**सही/-**
**अ‍ॅड आदित्य कटकदौंड**



## उरण नगरपरिषद

**ता. उरण, जिल्हा-रायगड, पिन कोड-४०० ७०२**

**जाहिर निविदा सुचना २०२४-२५**

उरण नगरपरिषद, उरण. यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार / पुरवठादार कडुन दोन लिफाफा पध्दतीने सिलबंद दरपत्रक मागविणेत येत आहे.

**कामाचा विषय -** उरण नगरपरिषद कार्यालया करिता फायर वॉल व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करुन कार्यान्वयीत करुन देणे बाबत.

**इसारा रक्कम-** १०००/-रुपये **निविदा फॉर्म फी.** १०००/-रुपये. **कालावधी -** कार्यादेश दिलेपासुन १ महिना

**निविदा प्रसिध्द दिनांक-** १०/१०/२०२४ सादर करणेची मुदत दिनांक १०/१०/२०२४ ते १८/१०/२०२४ पर्यंत.

**निविदा उघडणेचा दिनांक-** २१/१०/२०२४ रोजी अथवा नगरपरिषदेच्या प्रशासकीय सोईनुसार.

**आवश्यक कागदपत्र -** १) आयकर विवरणपत्र, २) अनुभवाचे दाखला, ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) जी. एसटी, प्रमाणपत्र, पॅनकार्ड ५) फॉर्म फी भरल्याची पावती ६) इसारा रक्कम भरल्याची पावती.

सुचना- १) सदर निविदेबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल.

**जा.क्र/उनप/भांडार/४०८०/२०२४**
**दि. ०९/१०/२०२४**

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद, उरण**


# वाणदे येथे सामाजिक सभागृहाचे लोकार्पण



**मुरुड : प्रतिनिधी**

सुमारे ७ लाख रुपयांचा निधी खर्च करून आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नामुळे वाणदे येथे सामाजिक सभागृहाचा लोकार्पण सोहळा शिवसेनेचे नेते विघ्नेश माळी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला आहे.

यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे,जिल्हा संघटक दिनेश मिणमिने, मुरूड तालुका संघटक यशवंत पाटील, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उप तालुका प्रमुख मनोज कमाने, शीघ्रे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संतोष पाटील, शिवसेनेचे युवा नेते दीपेश वरणकर, तेलवडे ग्रामपंचायशचे उपसरपंच निलेश तांबडकर, अविनाश शिंदे, मंदा ठाकूर, गोविंद दिवेकर, तुकाराम दिवेकर, काशिनाथ वारगे, काशिनाथ भोईर, संजय पाटील व असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परतीच्या पावसाचा जोर

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यामध्ये परतीच्या पावसाने बुधवारी (दि.९) सर्वांचीच दाणादाण उडवली. दुपारी विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला होता. वातावरणात गारवा आला असला तरी या पावसामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला.


## पनवेल महानगरपालिका
## जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी - १ नमुन्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | अनामत रक्कम रुपये | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ड, प्रभाग क्र. १९ मधील कापड बाजार मधील त्रिमुर्ती हॉटेल समोरील गल्ली मध्ये पेवर ब्लॉक बसविणे. | ७,४३,०२७/- (Without GST) | ७५००/- | ५०० + ९०= ५९० | ३० दिवस |

याकामी कोरी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करुन दिनांक १०१०/२०२४ पासुन दि १७/१०/२०२४ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.

२) सीलबंद निविदा दि. १८/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.

३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. १८/१०/२०२४ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. ५३६/५३८//२०२४**
**दिनांक :- ०८/१०/२०२४**

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त,I**
**पनवेल महानगरपालिका**



## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय उरण, जि. रायगड
## जाहीर नोटीस

श्री. विक्रांत भालचंद्र पाटील,
रा. उरण, ता.उरण, जि.रायगड. ........................ अर्जदार

**विषय:- मौजे पिरकोन येथील सर्व्हे नंबर ९५/१ या जमिन मिळकतीवरील दाखल कालबाहय बोजा नोंद कमी करणेबाबत**

अर्जदार श्री. विक्रांत भालचंद्र पाटील यांनी **मौजे पिरकोन, ता. उरण येथील सर्व्हे नंबर ९५/१ या जमिन मिळकतीच्या इतर हक्कातील दाखले पत्रे लिहून घेणार गुलालाल हरी वोकस हा कालबाहय बोजा कमी करून मिळणेबाबत विनंती अर्ज दि. २२.०७.२०२४ रोजी या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.**

उपरोक्त अर्जाबाबत इतर हक्कातील बोजा कमी करणेच्या अनुषंगाने हितसंबंधीत व्यक्ति यांनी स्वतः अथवा आपले वकिलांमार्फत सर्व साक्षी पुरावे व कागदपत्रांसह या कार्यालयात लेखी हरकती पेपर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ दिवसांमध्ये सादर कराव्यात. प्रकरणी सदर कालबाहय बोजा कमी करणेबाबत कोणत्याही हरकती प्राप्त न झाल्यास कोणाचीही बोजा कमी करण्यास हरकत नसल्याचे गृहीत धरुन उपलब्ध कागदपत्रांवरून निर्णय दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(डॉ. उध्दव कदम)**
**तहसिलदार उरण**


# आदर्श उत्तर भारतीय संघाचा नवरात्रोत्सव



**रोहे : प्रतिनिधी**

४१ वर्ष अविरतपणे नवरात्र उत्सवाचे आयोजन आदर्श उत्तर भारतीय संघाने केले आहे. याही वर्षी बाजारपेठेत आदर्श उत्तर भारतीय संघाच्या नवरात्र उत्सव मंडळात देवी विराजमान झाली आहे. नवरात्र उत्सवाच्या या मंडळांनी याही वर्षी देवी विराजमान केले असून नवरात्र उत्सव निमित्ताने विद्युत रोषणाई करण्यात आले आहे.

उत्तरेकडील राज्यातून नोकरी निमित्ताने व व्यवसाय निमित्ताने रोहा तालुक्यात स्थायिक झालेला आहेत. गेल्या कित्येक पिढ्या त्यांच्या या ठिकाणी स्थायिक आहेत. माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह यांच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतातील हे नागरिक एकत्रित येत आदर्श उत्तर भारतीय संघाने नवरात्र उत्सव सुरू केला. गेली ४१ वर्ष हे नवरात्र उत्सव अविरतपणे आजही चालू आहे. नवरात्र उत्सव चालू झाल्यापासून आजपर्यंत माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह हे अध्यक्ष असून त्यांच्या नेतृत्वाखाली अविरतपणे हा नवरात्र उत्सव चालू आहे.

# भाजप नेते सुरेश लाड यांचे वाढदिवस अभीष्टचिंतन

**खोपोली : प्रतिनिधी**

माजी आमदार तथा भाजपचे ज्येष्ठ नेते सुरेश लाड यांचा वाढदिवस बुधवारी (दि.९) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला, यानिमित्ताने त्यांच्या कार्यालयात भाजप कार्यकर्ते तसेच त्यांच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती.

यात जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य व शिक्षण सभापती नरेश पाटील, ज्येष्ठ नेते रमेश मुंडे, वसंत भोईर,भाजपच कर्जत खालापूर मतदारसंघ संपर्कप्रमुख किरण ठाकरे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरे कर, कर्जत खालापूर समन्वयक हेमंत नांदे, खोपोली शहर चिटणीस अजय इंगुलकर, उपाध्यक्ष दिलीप पवार, खोपोली युवा मोर्चा अध्यक्ष डॉ. निकेत पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, त्याचप्रमाणे जिल्हाभरातील भाजपचे वरिष्ठ पदाधिकारी, त्याचप्रमाणे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- kbmc@gmail.com वेबसाईट :- http://kbmc.gov.in

**संदर्भ :- कु.ब.न.प/आरोग्य/११६/२०२४-२०२५** **दिनांक : ०७/१०/२०२४**

**निविदा सुचना**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेची नवीन प्रशासकीय इमारत व आवश्यकतेनुसार नगरपरिषदेच्या मालकीच्या मालमत्तामधील दैनदिन साफसफाईचे काम बाह्य यंत्रणेद्वारे करणे या कामाची निविदा फॉर्म दिनांक ०९/१०/२०२४ ते दिनांक २३/१०/२०२४ पर्यंत ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या कुबनप संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा अनामत फी ऑनलाइन भरणेच आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल. निविदेचे सादरीकरण दिनांक २३/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर online सादर करणेचे आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहिर कळविण्यात येत आहे की, आम्ही **सौ. दिपाली देवेंद्र पाटील व श्री. देवेंद्र भिका पाटील, वय- सज्ञान, पत्ता- सदनिका नं. इ ७०१, मारवेल सोहम, प्लॉट नं. १४७, सेक्टर २, उलवे, ता. पनवेल, रायगड ४१०२०६,** यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत **श्री. सुरज कुमार शर्मा, वय - सज्ञान, पत्ता- रा. सदनिका क. ४०५, ४था, मजला, सिसिली सिएचएस, भुखंड क. ६०व ६१, सेक्टर १६ए, नेरुल, नवी मुंबई ४००७०६.**, यांचे बरोबर दिनांक ०९/०९/२०२४ रोजी भुखंड बयाना पावती तथा परस्पर सामंजस्य करारनामा केलेला आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहान, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहीवाट, अ‍ॅटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात खालील प्रमाणे दिलेल्या पत्त्यावर समक्ष येऊन भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सदर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आम्ही पुढील व्यवहार पुर्ण करु हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणा-या हरकतीचा विचार केला जाणार नाही व त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | संचीका क्रं. | भुखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र. चौ. मी |
|---|---|---|---|---|
| गाव-वहाळ, पुष्पक नोड, ता. पनवेल, जि. रायगड | WAG-ICIG-१२ | २१२ | २६ | ४० चौ.मी |

**दिनांक : ०९/१०/२०२४**
**नवी मुंबई**

**सही-**
**अ‍ॅड. देवेंद्र भिका पाटील**
**पत्ता- शॉप नं. १, श्रीजी सोहम, सी.एच.एस. लि., भुखंड कं. ७६, सेंक्टर २१, उलवे, नवी मुंबई. ४१० २०६**


# संगीत रजनीत बुवांच्या आठवणीने कर्जतकर मंत्रमुग्ध

**कर्जत : प्रतिनिधी**

भजनभूषण स्व. गजाननबुवा पाटील स्मारक समितीच्या वतीने सभागृहाचे लोकार्पण आणि बुवांच्या पुतळ्याचे अनावरण आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आल्यानंतर रात्री द स्वरबरसात इव्हेंटच्या सहकार्याने संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गायक कलाकारांनी अभंग, भारुड, गौळणी सादरीकरणामध्ये गजाननबुवांच्या काही रचना सादर केल्याने उपस्थित कर्जतकर मंत्रमुग्ध झाले.



स्मारक समितीचे अध्यक्ष दीपक करोडे व प्रसादबुवा पाटील यांनी उपस्थित कलाकारांचे स्वागत केले. सचिव रविंद्र लाड यांनी स्मारक समितीच्या कार्याची माहिती सांगितली. गजाननबुवांच्या काही रचनाही त्यांनी सादर केल्या. त्यांना तबल्यावर द स्वरबरसात इव्हेंटचे निर्माता विवेक भागवत, पखावजवर मिलिंद लिंगायत, सिंथेसायझरवर प्रणव कौलगुड, हार्मोनियमवर मंदार दीक्षित आणि टाळा वर विनोद तावडे यांनी साथ संगत दिली. ज्येष्ठ प्रवचनकार श्रीराम पुरोहित यांनी निरूपण करीत निवेदन करून गजाननबुवांच्या आठवणींना उजाळा दिला. दिव्यांग असलेल्या अष्टपैलू जनार्दन पानमंद यांचा या वेळी विशेष सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.


## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

**संदर्भ :- कु.ब.न.प/उद्यान/१०४/२०२४-२०२५** **दिनांक : ०९/१०/२०२४**

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**
**वृक्षप्राधिकरण विभाग**
**जाहीर सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ कलम ८ (३) क मधील तरतुदीनुसार, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खालील नमूद वृक्ष काढणे/पुनर्रोपण करणे बाबतचे अर्ज वृक्ष प्राधिकरण विभागात प्राप्त झालेले असून अर्जाबाबत हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत. संबंधित अर्ज व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | अर्जदार/जागेचा पत्ता | विकासकामात बाधित होत असलेली झाडे व त्यांचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | मे. राहुल बबनराव थोरात रा. स्टेशन पाडा कुळगाव बदलापूर पूर्व | **आवळा - १ एकूण-१ झाड** कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये मौजे सोनिवली येथील गट क्रमांक २१/१/ब येथे हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचा पम्पचे काम सुरु करणेच्या कामात एक झाड बाधित होत आहे. सदरचे झाड पुनर्रोपण करणेत येणार आहे. |

उपरोक्त प्रस्तावाविषयी आक्षेप व सूचना असल्यास सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात मुख्याधिकारी तथा वृक्ष अधिकारी कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यालय कुळगांव येथे देणेत याव्यात.

**सही/-**
**मारुती गायकवाड**
**मुख्याधिकारी तथा वृक्ष अधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**



## जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खालील दावा नोटीस ज्या अर्थी अर्जदार **रेणुकामाता महिला ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. पनवेल** ऑफिस क्र.२, पहिला मजला, उषा लक्ष्मी प्रिमायसेस सोसायटीविरुपाक्ष मंदिरासमोर, रिचीरिच शोरुमच्यावर, शिवाजी रोड, पनवेल ता. पनवेल जि.रायगड पिन. ४१०२०६ या संख्येने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील सभासदांविरुद्ध थकीत कर्ज भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापि खालील नमूद सभासदांना सुनावणी पोहोच होत नसल्याने किंवा आपले म्हणणे मांडलेले नाही नोटीस पोहोच गैरअर्जदार हजर राहिले नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्याचे म्हणणे मांडण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात दाखल करण्यासाठी अंतिम सुनावणी दि. २१.१०.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात सुनावणी आपण स्वतःवा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थित दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही व अर्जाची सुनावणी चालविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दावा क्रमांक | गैरअर्जदार / कर्जदार | कर्ज | थकित रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १७४ /२०२३ | **श्रीमती राजबिरी बिंदरसिंग पिवाल** | जामिनकी | रु. ९३२४१/- |
| २ | १७०/२०२३ | **श्री. महेश आर. परदेशी** | जामिनकी | रु. २३७५२९/- |
| ३ | १७३ /२०२३ | **श्रीमती सुषमा संतोष आपसिंगेकर** | जामिनकी | रु. १,००,४७७/- |
| ४ | १७२ /२०२३ | **श्रीमती अलोकिका गोरख पाटील** | जामिनकी | रु. १,१४,९०९/- |
| ५ | १७१ /२०२३ | **श्री. चेतन तुळशीराम भगत** | जामिनकी | रु. १,९६,०८१/- |

**सही-**
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,**
**पनवेल जि. रायगड**

विशेष टीपः ही नोटीस रेणूकामाता महिला ग्रामिण बिगरशेती सह. पतंसस्था मर्यादित यांनी जाब देणार सभासद यांचेवर बजावण्याबाबत त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ७८ अन्वये अधिकार दिलेले आहेत.

## निवडक

### दोन वृद्ध महिलांना लुबाडले

**पनवेल :** एस.टी.आगारात दोन महिलांना लुबाडल्याची घटना घडली. सुमिता कुथे (वय ५५) या आपल्या पतीसह पेण येथे जाण्यासाठी एस.टी.बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेवून अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सहा तोळ्याची गंठण ज्याची किंमत जवळपास दोन लाख १० हजार रुपये इतकी आहे लबाडीच्या इराद्याने चोरल्याची घटना घडली आहे. दुसऱ्या घटनेत प्रतिभा पाटील (वय ६१) यासुद्धा पनवेल–अलिबाग या एस.टी.बस मध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील दिड तोळ्याचे सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास ४१ हजार रुपये इतकी आहे. अज्ञात चोरट्यांनी लबाडीच्या इराद्याने चोरल्याची घटना घडली आहे.

### इलेक्ट्रीक सायकलची चोरी

**पनवेल :** इलेक्ट्रीक सायकलची चोरी झाल्याची घटना करंजाडे वसाहतीत घडली. आयुष ठाकूर हा त्याची १० हजार रुपयांची ई मोटार कंपनीची इलेक्ट्रीक सायकल घेवून सेक्टर २ ए येथे गरबा खेळण्यासाठी गेला होता व त्याने बाजूच्या त्याच परिसरात आपली सायकल उभी करून ठेवली होती. कुणीतरी अज्ञात चोरट्याने सायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### दारू विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल

पनवेल : दारू विक्री प्रकरणी खारघर पोलिसांनी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर पोलिसांना मुरबी गाव येथे एक व्यक्ती दारू विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी १५५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

### सिद्धी ठाकूर बनली डॉक्टर

**कळंबोली :** पनवेलची सिद्धी ज्ञानेश्वर ठाकूर हिने वैद्यकीय



क्षेत्रात डॉक्टरेट पदवी संपादीत केली आहे. तिचे कौतुक होत आहे. पदवीदान सोहळ्यास बेंगलोर येथे उपस्थित राहून सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे स्वप्नही सिद्धीच्या आई–वडिलांनी पूर्ण केले आहे. ज्ञानेश्वर ठाकूर व शुभांगी ठाकूर हे दोघेही ज्ञानदानाचे काम शिक्षकी पेशातून गेले पंचवीस वर्षापासून करीत आहेत. त्यांची मुलगी सिद्धी ठाकूर हिला डॉक्टर व्हायचे होते. यासाठी तिच्या आई–वडिलांनी कर्नाटकामधील वैद्यकीय महाविद्यालयात तिचा प्रवेश केला. वैद्यकीय शिक्षणातील प्रत्येक वर्षी तिथे मेहनत घेऊन परीक्षेत चांगले गुण प्राप्त करून वैद्यकीय क्षेत्रातील अखेरचीही पदवीही तीने चांगल्या गुणांनी संपादित केली आहे.

# बांगलादेशी महिलांवर कारवाई

## कळंबोलीतून गुन्हेशाखेच्या पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई गुन्हेशाखेच्या पोलिसांनी कळंबोलीत बेकायदापणे वास्तव्यास असलेल्या तीन बांगलादेशी महिलांविरोधात कारवाई केली आहे.

चमिली पप्पुहशमेर सिखडे (३८ वर्ष), हमिदा शुकरीशौदत गाझी (२७ वर्ष) व सलमा मोशियर शेख (२९ वर्ष) अशी कारवाई केलेल्या बांग्लादेशी महिलांची नावे असून या सर्व महिला घरकाम करणाऱ्या असल्याचे पोलिसांनी सांगितले. नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे, गुन्हेशाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात बेकायदेशीर वास्तव्यास असणार्या बांगलादेशी नागरीकांवर कारवाई करण्याचे आदेश अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास दिले होते.



यानुसार एएचटीयु पथकाच्या एपीआय अलका पाटील यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रामा नामा भगत चाळ, सेक्टर ३, कळंबोली गांव येथे बांगलादेशी नागरीक बेकायदेशीरपणे वास्तव्यास असुन ते सकाळी ६ ते ०७.३० वाजेच्या दरम्यान कामावर निघुन जात असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीनुसार अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाने, नमूद ठिकाणी पथकासह सकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास या ठिकाणी छापा टाकला. या वेळी तीन महिला मिळुन आल्या. या महिलांकडे पथकास भारतीय नागरिकत्वाबाबत कोणताही पुरावा अगर कागद पत्रे मिळुन न आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, घुसखोरीच्या मार्गाने भारत बांगलादेश सिमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवुन व स्थानिक मुलकी अधिकार्यांचे पुर्व परवानगीशिवाय व कोणत्याही वैध प्रवासी कागपत्रांशिवाय मागील दहा ते पंधरा वर्षा पासुन भारतात प्रवेश करून त्या राहत असल्याचे उघडकीस आले.

दरम्यान, महिला त्या भारतीय नागरीक असल्याबाबत कोणताही पुरावा सादर करू शकल्या नसल्याने त्यांच्याविरोधात कंळबोली पोलीस ठाणे येथे पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० कलम ३(ए)सह ६(ए), व विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६चे कलम १४(अ) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास कंळबोली पोलीस करत आहेत.

## बेवारस वाहनांच्या मालकी हक्काबाबत आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्या पोलीस ठाण्यात विविध गुन्ह्यात जप्त असलेली वाहने तळोजा पोलीस स्टेशन आवारात शिफ्ट केली आहेत.



मोटरसायकली स्कूटर, रिक्षा बरेच दिवसापासून उभी असून या वाहनांच्या मालकाचा शोध घेणे व लिलाव प्रक्रिया पूर्ण आवश्यक असल्याने मूळ मालकास कागदपत्रासह सानपाडा पोलीस ठाणे येथे सात दिवसांत हजर राहण्यास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याशी संपर्क साधण्यात यावा, अशी माहिती सानपाडा पोलीस ठाणे नवी मुंबईचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी दिली आहे.

सानपाडा पोलीस ठाणे ठाण्याच्या हद्दीत विविध कारणास्तव प्राप्त झालेली तीन दुचाकी वाहने, १ थ्री व्हीलर एकूण ०४ बेवारस वाहने सानपाडा पोलीस ठाणे आहेत. वाहनांच्या मूळ मालकांनी सात दिवसांच्या आत आपली वाहने कागदपत्रे दाखवून या बातमी सोबत दिलेल्या यादीतील आपल्या वाहनांची ओळख पटवून ती घेऊन जावी असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई यांच्याशी संपर्क साधण्यात यावा, अशी माहिती सानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय नाळे यांनी यांनी दिली.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे संगीत क्षेत्रात सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद महाराष्ट्र कोकण प्रांत चेंबुर शाखेतर्फे आयोजित प्रांतीय राष्ट्रीय चेतना के स्वर समूह गीत गायन स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन राजस्तरीय स्पर्धेत हिंदी, संस्कृत व मराठी लोक गीतात द्वितीय परितोषिक मिळवून आपल्या शाळेचे नाव महाराष्ट्र राज्यात उज्वल केले.

हिन्दी गीत गायन, संस्कृत गीत गायन व मराठी गीत गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक, मिळवून आपल्या शाळेच्या शिरपेचात संगीत क्षेत्रात आणखी एक



मानाचा तूरा रोवळा.

या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी –पंकज मोकल, रुद्र भट, समर रणशेवरे. यशिका चव्हाण, यशिता बडेकर, अफशीन सदात, अनाया कोटम्बे, वृंदा बोरवणकर या विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे संगीत शिक्षक दत्तात्रय मोकल व मधुकर धोंगडे, यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विद्यार्थ्यांचे, राज्य पातळीवर यशस्वी झाल्याबद्दल कौतुक करून अभिनंदन केले.



**पेण : आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाशी येथे आई जगदंबा मातेचे दर्शन घेतले. या वेळी रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, जिल्हा सरचिटणीस मिलींद पाटील, तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, वाशी माजी सरपंच गोरख पाटील, मंगलदास ठाकूर, दीव उपसरपंच सचिन पाटील, निलेश पाटील आदी उपस्थित होते.**

## दुर्गामाता दौड (माळ सातवी)






**पनवेल : शारदेय नवरात्र उत्सवाचा सातवा दिवस. अशोक पुष्प सोसायटी विचुंबे येथून प्रेरणा मंत्र घेऊन दौड सुरू करण्यात आली. पुढे मार्गक्रमण करीत संपूर्ण विचुंबेमध्ये दौड काढण्यात आली. नंतर दौड गावदेवीच्या मंदिरात येवून पोहचली. तेथे देवीची आरती करण्यात आली. श्लोक व गोंधळ घेण्यात आला व नंतर पुन्हा अशोक पुष्प सोसायटीच्या येथे येवून ध्येयमंत्र घेऊन दौडीची सांगता करण्यात आली.**

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गणित विभागातर्फे बुधवारी (दि.९) इकडं मॅथेमॅटिक्स इन कलर या स्पर्धेचे आयोजन केले होते.





या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन त्यांच्या वेगवेगळ्या गणितीय संकल्पना चित्रकलेच्या माध्यमातून मांडल्या. या स्पर्धेचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना गणित विषयात आवड निर्माण व्हावी तसेच वेगवेगळ्या गणितीय संकल्पना स्पष्ट व्हाव्यात हा होता. या स्पर्धेसाठी सर्व शाखेतील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी गणित विभागातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच प्राध्यापक यांचे स्पर्धा यशस्वीरित्या घेतल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतीक्षा पाटील गणित विभाग प्रमुख यांनी केले तसेच प्रा. दिपाली लावंड व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात आधार कॅम्प

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयामध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ ज्योत्स्ना ठाकूर यांच्या प्रयत्नाने आधार कॅम्पचे आयोजन करण्यात आले .

विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड मध्ये चूक राहिल्यास त्याचा त्रास पालकांना सहन करावा लागतो. विद्यालयातील अनेक बाबींसाठी आधार कार्डची आवश्यकता असते. विद्यालयाची संच मान्यता हीदेखील आधार कार्डनुसार केली जाते आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे आधार कार्ड



बिनचुक असणे गरजेचे आहे.

आधार कार्डचे नूतनीकरण, नवीन आधार कार्ड तयार करणे तसेच या कॅम्पचा फायदा पालकांनादेखील व्हावा या दृष्टीने हा कॅम्प विद्यालयात लावला होता.

उलवे नोडमधील पियुष कैलास देशमुख, अनिकेत आप्पासाहेब रास्ते व साक्षी राजेंद्र चौगुले यांनी विद्यालयात येऊन हा कॅम्प यशस्वीरित्या राबविला. एक ऑक्टोबर ते सात ऑक्टोबर या एक आठवड्यात घेतलेल्या कॅम्पमध्ये जवळजवळ ३४१ आधार कार्डचे नूतनीकरण व नवीन आधार कार्ड तयार करण्यात आले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी हा कॅम्प विद्यालयात राबविल्याबद्दल पालकांनी त्यांचे अभिनंदन केले.





**पनवेल : नवरात्र उत्सवानिमित्त आदर्श महिला मंडळ सोसायटी पनवेल यांच्या वतीने भोंडल्याचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. भोंडला हा पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात प्रचलित असलेला स्त्रियांच्या सामुदायिक खेळाचा प्रकार आहे. दरम्यान, शहरातील गणेश मंदिराच्या सभागृहात मोठ्या उत्साहात झाला.**





**उलवे नोड : मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील उलवे नोड सेक्टर ८ येथील जय अंबे नवरात्रोत्सव मंडळातील नवरात्रोत्सवात लाभार्थी महिलांना आमदार महेश बालदी यांच्याकडून साड्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, अध्यक्ष जीवन पाटील, सचिव शंकर धादवड, खजिनदार सयाजी चाळके, सभासद राजेंद्र लोहार, किशोर पाटील, सुदर्शन घरत, अभिजित अंभोरे, पतंगराव कणसे, महिला अध्यक्षा राणी सुभाष पवार, महिला सभासद लुनिता सयाजी चाळके, कोमल राजेंद्र लोहार, अनिता शंकर धादवड, शितल शेखर भेके, सुवर्णा उमेश शेट्टी, दिपाली मयुर जाधव, छाया भास्कर आदी उपस्थित होते.**

निवडक

## नेत्रशिबिरात ७९ रुग्णांची तपासणी



**माणगाव** : माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगावातील उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि.९) याठिकाणी नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ७९ रुग्णांची तपासणी केली. त्यापैकी ३३ रुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. हे शिबिर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.

## 'रोटरी'तर्फे शैक्षणिक साहित्यवाटप



**पेण** : रामवाडी येथील के. एम एम. संस्थेचे आदर्श विद्यामंदिर रामवाडी येथील विद्यार्थ्यांना हॅप्पी स्कूल प्रकल्पांतर्गत रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने बेंच व स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष शिरीष पिंपळकर, शुभांगी पिंपळकर, प्रकल्प संचालक अमर म्हात्रे, प्रकल्प अधिकारी राजेंद्र कदम, आदर्श विद्यामंदिरचे अध्यक्ष पी. डी. पाटील, उपाध्यक्ष कृष्णा वर्तक, कवी एन. जे. पाटील, दीनानाथ पाटील सदस्य अमरचंद पाटील,गजानन पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षक व विद्यार्थीवर्ग उपस्थित होते. 'रोटरी'च्या वतीने या शाळेला वॉटर फिल्टर, बेंच, शाळेसाठी बाथरूमची व्यवस्था, दप्तर, पुस्तके वाटप केल्याचे सांगून मुख्याध्यापिका यांनी आभार मानले.



**पेण : जिते येथील एनएडी चुनाभट्टी मंडळाच्या वतीने नवरात्री उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे.**

# रोह्यात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची हजेरी

## शेतकरी धास्तावला; सगळीकडे ढगाळ वातावरण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह बुधवारी (दि.९) दुपारनंतर तालुक्यात विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला आहे. संपूर्ण वातावरण काळोखमय झाल्याचे दिसून आले.



एकीकडे नवरात्र उत्सवाची धामधुम तर दुसरीकडे ऑक्टोबर हिटची चाहूल लागली असतानाच गेले दोन-तीन दिवस अधून मधून पाऊस पडत होता, परंतु बुधवारी सकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. दुपारी तर विजेच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. सगळीकडे पाणीच पाणी झाल्याचे दिसून आले. ढगांचा कडकडाट, विजेचा प्रकाश व जोरदार पावसाची हजेरी असे समीकरण दुपारनंतर रोहा तालुक्यात दिसून आले.

रोहा तालुक्यात भातशेती चांगल्या पद्धतीने तयार झाली आहे. त्यामुळे चांगले उत्पादन यावर्षी शेतकऱ्यांना मिळेल अशी आशा आहे, परंतु बुधवारी पडलेल्या जोरदार पावसामुळे भातशेतीचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकरी मात्र धास्तावला आहे.

सर्वत्र नवरात्र उत्सव सुरू आहे. नवरात्रोत्सवासाठी मंडप व विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, परंतु या पावसामुळे त्यांचे नुकसान झाले आहे. परतीचा पाऊस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात जोरदार पडला आहे. आलेल्या पावसामुळे काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले.

# परतीच्या पावसामुळे पुन्हा बोटी किनाऱ्यावर



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यात बुधवारी पहाटे सकाळपासूनच हवामानात बदल होऊन पाऊस पडू लागला आहे. पाऊस पडू लागल्याने खोल समुद्रात मासेमारी करावयास गेलेल्या होड्या समुद्रकिनारी आल्या आहेत.

अचानक वातावरणात बदल होऊन पाऊसाचे प्रमाण वाढले आहे. याअगोदर ऑक्टोबर हिटचा तडाखा लोकांना सहन करावा लागत होता. किमान ३५ डिग्री सेल्सिअस तापमान झाल्याने लोकांना घामाच्या धारा सहन कराव्या लागत होता, परंतु बुधवारी पहाटे सकाळपासूनच पाऊस पडू लागल्याने वातावरणात गारठा आला आहे.

बोटी किनाऱ्याला लागल्याने मासळी बाजारात मासळीचे प्रमाण थोडे घटले आहे. जोरदार पाऊस न बरसत संथ गतीने पाऊस पडल्याने भाताची रोपे सुरक्षित असल्याची माहिती कृषी खात्यामार्फत सांगण्यात आले आहे. यंदा पाऊस खूप चांगला पडल्याने भाताच्या पिकात विक्रमी वाढ होणार, असे संकेत कृषी खात्यामार्फत देण्यात आले आहेत.

पावसाचे प्रमाण वाढल्याने बोटी जरी किनाऱ्यास आलेल्या असतील तरी वातावरणात बदल होताच व पुन्हा स्वच्छ सूर्यप्रकाश पडताच बोटी पुन्हा मासेमारी करावयास जातील, अशी माहिती मच्छिमार संस्थांनी दिली आहे.

## खासदार बारणे यांच्या हस्ते रानसई गावात पूजा



**चौक : प्रतिनिधी**

श्री आंबा माता श्री झोलाई गावडाई रानसई मंदिरात बुधवारी (दि.९) सत्यनारायण महापूजा ग्रामस्थांच्या वतीने आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीत खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचाराच्या शुभारंभाचा नारळ खालापूर तालुक्यातून रानसई या गावातून वाढवण्यात आला होता. रानसई गावात आंबा माता श्री गावडाई झोलाई हे मंदिर असून नवसासाठी प्रसिद्ध आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनीही देवीला विजयाचा आशीर्वाद मागितला होता. खासदार श्रीरंग बारणे लोकसभा निवडणुकीत विजयी व्हावे म्हणून ग्रामस्थांनीदेखील नवस केला होता. त्यानिमित्त मंदिरात ग्रामस्थांनी सत्यनारायण महापुजा बांधली होती. या वेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

खासदार श्रीरंग बारणे यांनी देवीची ओटी भरली आणि सत्यनारायण पुजेचे दर्शन घेतले. त्यांच्यासोबत आमदार महेंद्र थोरवे, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, संपर्क प्रमुख विजय पाटील, शाखा प्रमुख रविंद्र मोरे, प्रभाकर मोरे, सुनील मोरे, मिलिंद चव्हाण, भूपेश मोरे, महिला संघटक रेश्मा आंग्रे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी कोयना प्रकल्पग्रस्त जनतेच्या अडचणींची माहिती खासदार श्रीरंग बारणे यांनी घेऊन लवकरच याबाबत वरिष्ठ पातळीवर बैठक घेण्याचे आश्वासन दिले.



**खोपोली : हरियाणा राज्यात भाजपाने निवडणुकीत भाजपने सरशी केली. या पार्श्वभूमीवर खोपोली शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी करीत मिठाईचे वाटप केले. भाजप शहराध्यक्ष रमेश रेट्रेकर व महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष अश्विनी अत्रे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.**

## हरवलेल्या पल्लवी पाटीलचा मृतदेह भोगावती नदीत सापडला

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील हनुमान आळीत राहणाऱ्या गृहिणी पल्लवी योगेश पाटील या सोमवारी घर सोडून निघून गेल्याची घटना समोर आल्यानंतर महिलेचा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या महिलेचा शोध सर्वत्र सुरू असताना मंगळवारी (दि.८) गणपतीवाडी येथील भोगावती नदी पुलाखाली मृतदेह आढळून आल्याने सर्वत्र खळबल उडाली.

पेण नगरपरिषदेच्या फायर ब्रिगेड जवानांनी आणि पेण पोलिसांच्या मदतीने



सदर महिलेचा मृतदेह नदीतून बाहेर काढण्यात आला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल हे करीत आहेत.

## माथेरान नगरपालिकेकडून कार्यगौरव आणि गुणगौरव सोहळा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान गिरीस्थान नगरपालिकेकडून शहरातील पाच मान्यवरांचा कार्यगौरव आणि गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.

नगरपालिकेकडून या आयोजित कार्यक्रमास स्थानिक नागरिक, आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी या वेळी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित होते.



माथेरान गिरीस्थान नगरपालिकेच्या हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहात पालिकेमार्फत या सुंदर सोहळ्याचे आयोजन केले होते. याठिकाणी नुकत्याच सेवा निवृत्त झालेल्या गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, माथेरानमधील बी.जे. रुग्णालयात कार्यरत असलेल्या एमबीबीएस डॉ. रुपाली मिसाळ, माथेरान नगरपालिका वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे, नुकतेच सीए.ची परीक्षा उत्तीर्ण झालेले येथील स्थानिक तरुण दर्शल शहा आणि शहरातील जुने वयस्कर मालवाहक श्रीरंग कदम अशा पाच मान्यवरांचा माथेरान नगरपालिकेच्या वतीने कार्यगौरव आणि गुणगौरव सोहळा आयोजित केला होता.

या सर्व सत्कारमूर्तींनी आप आपल्या कार्यात मोलाचे योगदान दिले असल्याचे या वेळी सांगण्यात आले. नगरपालिका प्रशासक तथा मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींचे अभिनंदन केले.

या वेळी माथेरानमधील स्थानिक नागरिक, आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच नगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल नाईकडे यांनी केले तर सदानंद इंगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## अभ्यासाबरोबर खेळामध्ये सक्रिय रहा -मंत्री तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

अभ्यासाबरोबर खेळामध्ये सक्रिय राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने डॉ. सी. डी. देशमुख कन्याशाळा येथे विद्यार्थ्यांना सायकल वाटपावेळी त्या बोलत होत्या.

या वेळी राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी नगरसेवक महेंद्र गुजर, अहमद दर्जी, मयुर दिवेकर, स्नेहा आंब्रे, प्राजक्ता चव्हाण, चंद्रकांत पार्टे, निलेश शिर्के, सागर बोबड, जालींदर शेवाळे, माज सवाल, सनी पितळे आदी उपस्थित होते.



## पालीतील ओसवाल प्लाझामध्ये नवरात्रोत्सव



**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यासह राज्य आणि देशभरात मोठ्या उत्साही आणि भक्तिमय वातावरणात सर्वत्रच नवरात्रोत्सव साजरा होतोय. अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या सुधागड तालुक्यातील पाली येथील ओसवाल प्लाझामध्ये एकमेव श्री संतोषी मातेचे मंदिर उभारले आहे.

शकुंतला मोहन ओसवाल यांनी तब्बल २० वर्षे उपवास आणि तप असे मोठ्या भक्तिभावाने श्री संतोषी मातेचे नियमित व्रत केले. त्यातूनच मंदिर उभारणीच्या कामात उद्योजक मोहन ओसवाल यांना यश आले असल्याचे बोलले जातेय. सण २०१३ सालापासून नवरात्रोउत्सवाची सुरुवात झाली. पालीतील याच ओसवाल प्लाझामध्ये घट स्थापनेपासून नवरात्रोत्सवाची मोठी धूम पहावयास मिळतेय, श्री संतोषी माता मंदिरात अत्यंत भक्तिमय वातावरण दिसून येतेय.

या मंदिरात अतिशय सुंदर व रेखीव देवीची मूर्ती विराजमान असून या देवीचा महिमा अपार असल्याने दूरवरून भाविक दर्शनासाठी येतात, या मंदिरात दैनंदिन पूजा पाठ, आरती, प्रसाद व रात्री नवरात्रोत्सवानिमित्त नृत्य दांडिया गरबा असे कार्यक्रम पार पडतायेत. लहान, थोर, तरुण आबालवृद्ध सारेच मोठ्या उत्साहाने या सणात सहभागी होताना दिसत आहेत. याठिकाणी विविध सांस्कृतिक स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, संगीत खुर्ची, होम मिनिस्टर, पैठणी असे कार्यक्रम पार पडतात.

## नांदगाव येथे महालक्ष्मी याग

**मुरूड : प्रतिनिधी**

श्रीगुरू सावर्डेकर महाराज संस्थापित रूद्ररेवा सेवा प्रतिष्ठान अंतर्गत श्रीगुरूमाता सेवाश्रम आयोजित शारदिय नवरात्रोत्सव कार्यक्रमाच्या सांगताप्रित्यर्थ १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पोर्णिमेनिमित्ताने आगमोक्त महालक्ष्मी यागाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात श्रीयंत्रपूजन, कुंकूमार्चन, कन्यापूजन, आगमोक्त महालक्ष्मी याग, लक्ष्मी इंद्र पूजन इत्यादी धार्मिक विधी होतील. तदनंतर दुध व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात सज्जनांनी सहभागी होऊन श्री जगदंबेच्या चरणी आहुती समर्पण करण्यासाठी तसेच अधिक माहिती व संपर्क यासाठी श्रीगुरू सावर्डेकर महाराज (९०११२३९६३२), दिपेश पेरवे (७९७२४४४९३९), रश्मी राम पाटील (९२०९८४३१९१) यांच्याशी संपर्क साधावा.




महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ५०/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. नवीन सावित्री जॅकवेल येथे अतिरिक्त रोझ पीसेस बसवणे. | ₹ ४०,०२,९९३.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती.... रस्त्याच्या कडेने गवत साफ करणे आणि औद्योगिक क्षेत्रातील खड्डे भरणे. | ₹ ३३,२७,९९१.०० |
| ३ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती..... पाताळगंगा येथील जुन्या एचएसआर पर्यंत सेवा रस्त्यालगत रिटेनिंग वॉल आणि कर्ब वॉलचे बांधकाम करणे. | ₹ ३३,४८,५२८.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्र .. लोटे-परशुराम , खेर्डी-खडपोली , महाड , विळे- भागड व रोहा पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... मऔविमच्या विविध वॉटर वर्क्समध्ये लिक्विड ॲल्युमिना फेरिक ॲलम ग्रेड ४ चा पुरवठा करणे. | ₹ ३७,३८,३००.०० |
| ५ | महाड व अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती....सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या डिस्पोजल पंपिंग स्टेशनवरील इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लोमीटरची दोन वर्षांच्या कालावधीकरीता देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १४,६५,१४४.०० |
| ६ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा फेज २ संप ते सीईटीपी तळोजा येथील साखळी क्र. १५४०.०० ते १७७०.०० पर्यंतच्या एचडीपीई सांडपाणी संकलन वाहिनीचा जुना खराब झालेल्या पॅच तातडीने बदलणे. | ₹ ३९,६४,८४६.०० |
| ७ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... वाघिवली खाडीतील साखळी क्र. १५४० ते १७७० मिटर दरम्यानच्या सांडपाणी वाहिनीवरील गळती बंद करणे. | ₹ ४०,०९,४०६.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १०/१०/२०२४ पासून दिनांक १७/१०/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १४/१०/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १५/१०/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.













पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून तालुक्यात ठिकठिकाणी कोट्यवधींची विकासकामे सुरू आहेत. त्या अनुषंगाने कळंबोली, उमरोली, महालक्ष्मी नगर, धोदाणी, चिपळे आदी ठिकाणी विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, राजेंद्र पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विश्वजीत पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले व त्यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले.







रयत सेविका तु. ह.वाजेकर विद्यालय फुंडे, उरण.



एकता मित्र मंडळ, सेक्टर ३४, कामोठे येथील महिला.




नवरंग निळा



ग्रंथालय विभाग, चांगू काना ठाकूर विद्यालय, पनवेल



ओएनजीसी हेल्थ सेंटर, पनवेल.






महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ वसाहत महिला मंडळ, चेंबूर



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, (महापारेषण) सांघिक कार्यालय, वांद्रे, मुंबई

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com